254

Tanjore Saraswati Mahal Series No. 17

588

588

# ॥ लोक गीत ॥

# LOKA GEET

(Folk - Songs in Mahratti)

THE TANJORE MAHARAJA SERFOJI'S SARASWATI MAHAL LIBRARY

GOVERNMENT OF MADRAS

Madras Government Oriental Series
No. LII b.

1958

la
588

588

588

Madras Government Oriental Series

588

*Published under the Authority of the Government of Madras*

General Editor:

T. CHANDRASEKHARAN, M.A., L.T.,

Curator,

Government Oriental Manuscripts Library,

MADRAS.

No. LII b: लोक गीत

Tanjore Saraswati Mahal Series No. 17

# LOKA GEET

## (Folk-Songs in Mahratti)

Compiled and Edited
By
**Sri A. Krishnaswamy Mahadick Rao Sahib, B. A.**

Published
By
**S. Gopalan, B. A., B. L.,**
Hon. Secretary for the Administrative Committee,
T. M. S. S. M. Library, Tanjore.

1950

**Price Re. 1—0—0**

# *PREFACE*

*The present compilation named "Loka Git" contains a select number of folk-songs in Marathi which are preserved in hundreds in the Saraswati Mahal Library. It speaks very highly of the catholic taste in literature of the Maharashtra Rulers, especially Rajah Serfoji, that they have thought fit to record in manuscripts so many folk-songs and preserve them for the benefit of posterity. It may safely be stated that there is no other language in which so many folk-songs are now preserved as Marathi and in no place is there a bigger collection of it than in Tanjore.*

*The characteristic feature of these songs is their cheerful tone of optimism and spiritual bent which are the finest points of Indian culture. From the most trifling household work to the most toil-some labour, each piece of handiwork is sweetened by these songs and heightened to the level of steps in spiritual culture. They present to the reader the most loveable side of the Maratta people and are therefore worthy of preservation and publication.*

*The editor of this work, Sri A. Krishnaswami Mahadick Rao sahib, who is a member of the administrative committee of this library has been devoting a good part of his time to the examination and editing of the Marathi manuscripts of this Library. Our thanks are due to him for the pains he has taken to select and edit these songs from the large number in our library.*

*Our grateful thanks are also due to the Government of Madras for the timely assistance given to us to publish this and other precious works in the Saraswathi Mahal Library.*

Tanjore
November, 1950.

S. GOPALAN,
HONORARY SECRETARY,
Saraswati Mahal Committee.

# GENERAL EDITOR'S INTRODUCTION TO THE

# MADRAS GOVERNMENT ORIENTAL SERIES

---

The Government of Madras took up for consideration the question of publication of the various manuscripts in different languages on subjects like Philosophy, Medicine and Science etc., early in May 1948. Important Manuscript Libraries in the Madras Presidency were requested to send a list of unpublished manuscripts with them for favour of being considered by the Government for publication. The Honorary Secretary of the Tanjore Maharaja Serfoji's Saraswathi Mahal Library, Tanjore, alone complied with this request. This list as well as a similar list of unpublished manuscripts in the Government Oriental Manuscripts Library, Madras were carefully examined and a tentative selection of manuscripts suitable for publication was made. The Government in their Memorandum No. 34913/48-10, Education dated 4-4-1949 constituted an expert committee with the Curator of the Government Oriental Manuscripts Library, Madras, as the Secretary for the final selection of manuscripts suitable for printing and for estimating the cost of publications. The following are the members of the Committee.

**The name of personnel of the committee constituted for selecting manuscripts for publication.**

---

1. Sri T. M. Narayanaswami Pillai M. A. B. L.
2. ,, R. P. Sethu Pillai, B. A. B. L.

3. Sri C. M. Ramachandra Chettiar B. A. B. L.
4. ,, R. Krishnamoorthy (Kalki)
5. Dr. N. Venkataramanayya M. A. Ph. D.
6. ,, M. Ramanuja Rao Naidu M. A.
7. ,, V. Prabhakara Sastri.
8. ,, N. Venkata Rao.
9. ,, H. Sesha Ayyangar.
10. ,, Masti Venkatesa Ayyangar.
11. ,, M. Mariappa Bhat M. A. L. T.
12. Dr. C. Achyuta Menon B. A. Ph. D.
13. Sri C. Kunhan Raja M. A. D. Phil.
14. ,, A. Sankaran M. A. Ph. D., L. T.
15. ,, P. Rama Sastri.
16. ,, S. K. Ramanatha Sastri
17. Dr. Abdul Haq., M. A. D. Phil, (Oxen).
18. Sri P. D. Joshi.
19. ,, S. Gopalan B. A. B. L.
20. Afzul-u-Ulma Hakim Khader Ahamed.
21. Sri T. Chandrasekharan M. A. L. T.

The members of the Committee formed into Sub-committees for the various languages, Sanskrit, Tamil, Telugu, Kannada, Malayalam, Marathi and Islamic languages. They met during the month of May 1949 at Madras and at Tanjore to examine the manuscripts and make a selection. The recommendations of the Committee were accepted by the Government in G. O. No. Mis. 2745 Education dated 31—8—1949 and they decided to call these publications as the "*Madras Government Oriental Series,*" and appointed the Curator, Government Oriental Manuscripts Library, Madras–5, as the General Editor of the publications. The following manuscripts have been taken up for publication during the current year:—

## "A" From the Government Oriental Manuscripts Libra Madras

1. *Kappal Sastram.*
2. *Anubhava Vaidya Murai.*
3. *Atthanakolahalam.*
4. *Upadesa Kandam.*
5. *Cholan Purva Pattayam.*
6. *Konga Desa Rajakkal.*
7. *Sivajnana Dipam.*
8. *Sadasiva Rupan, with commentary.*

### Telugu

1. *Sangita Rathnakaramu.*
2: *Aushada Yogamulu.*
3. *Vaidya Nighantu.*
4. *Dhanurvidya Vilasamu.*
5. *Yoga Darsana Visayamu.*
6. *Khadga Lakshna Siromani.*

### Sanskrit

1. *Vishanarayaniyam.*
2. *Bhargava Nadika.*
3. *Hariharacaturangam.*
4. *Brahma Sutra Vritti. Mitakshara.*
5. *Nyayasiddhanta Tatvamrtam.*

### Malayalam

1. *Garbha Chikitsa.*
2. a *Vasthulakshanam.*
   b *Silpasastram.*
   c *Silpavisayam.*
3. *Mahasaram.*
4. *Kanakkusaram.*
5. *Kriyakramam.*

### Kannada

1. *Lokopakara.*
2. *Rattamata.*
3. *Diksabodhe.*
4. *Asvasastram.*
5. a *Aushadhagalu.*
   b *Vaidya Vishaya.*
6. *Sangita Ratnakara.*
7. *Supasastra.*

### Islamic Languages.

1. *Jamil-Al-Ashya.*
2. *Tibe-E-Faridi.*
3. *Tahquiq-At-Buhran.*
4. *Safinat-Al-Najat.*

---

## "B" From the Tanjore Maharaja Serfoji's Saraswathi Mahal Library, Tanjore.

---

### Tamil

1. *Sarabendra Vaidya Muraigal (Diabetes).*
2. *Do (Ear, Nose, Throat, Head).*
3. *Konganar Sarakkuvaippu.*
4. *Tiruchitrambalakovaiyar with padavurai.*
5. *Sarabendra Vaidya Murai* (Anaemia).
6. *Talasamudram.*
7. *Bharatanatyam.*
8. a *Pandikeli Vilasam Natakam.*
   b *Pururava Chakravarthi Natakam.*
   c *Madana Sundara Vilasa Natakam.*
   d *Percy Macqueen's Collection in the Madras University Library of Folklore.*
9. *Ramayyan Ammanai.*
10. *Sarabendra Vaidya Murai (Asthma, Cough and other lung diseases).*

## Telugu

1. *Kamandaka Nitisaramu.*
2. *Talodasapranadipika.*
3. a *Raghunatha Nayaka Abhyudayamu.*
   b *Rajagopala Vilasamu.*
4. *Ramayanamu by Katta Varadaraju.*

## Marathi

1. *Natyasastra Sangraha.*
2. a *Book of Knowledge Vahi.*
   b *Folk Songs.*
   c *Doradharun Veni Padhati.*
   d *Aswasa Chatula Tumni.*
3. a *Pratapasimhendra Vijaya Prabhanda.*
   b *Sarabendra Theerthavali.*
   c *Lavani.*
4. *Devendra Koravanji.*
5. *Bhakta Vilas.*
6. *Sloka Badha Ramayana.*

## Sanskrit

1. *Aswasastra with Tricolour illustrations.*
2. *Rajamriganka.*
3. *Chikitsamritasagara.*
4. *Geetagovinda Abhinayam,*
5. a *Chola Champu.*
   b *Sahendra Vilasa.*
6. *Dharmakutam – Sundara kanda.*
7. *Jataka Sara.*
8. *Vishnutatva Nirnaya Vyakhya.*
9. *Sangita Darpana.*
10. *Beeja Pallava.*

It is hoped that the publication of most of the important manuscripts will be completed within the next four years.

Some of the manuscripts taken up for publication are represented by single copies in the Library and consequently the mistakes that are found in them could not be corrected by comparing them with other copies. The Editors have, however, tried their best to suggest correct readings. The wrong readings are given in round brackets and correct readings have been suggested in square brackets. When different readings are found, they have been given in the foot note or incorporated in the text itself.

The Government of Madras have to be thanked for financing the entire scheme of Publication although there is a drive for economy in all the departments. My thanks are due to the members of the Expert Committee who spared no pains in selecting the maunscripts for publication. I have also to thank the various editors, who are experts, in their own field, for readily consenting to edit the manus- cripts and see them through the press. The various Presses that have co-operated in printing the manuscripts in the best manner possible also deserve my thanks for the patience exhibited by them in carrying out the corrections made in the proofs.

| | |
|---|---|
| Oriental Mss. Library<br>Madras 1950. | T. CHANDRASEKHARAN<br>*General Editor.* |

# INTRODUCTION

This little publication aims at publishing Mahratti hymns and devotional songs in the manner of folk-songs of famous Mahratta poets who adorned the courts of Tanjore Rajahs or visited Tanjore in their life-time and left a rich heritage of superb devotional songs meant to be sung by every one at all times. They are chiefly allegorical pieces in the style and manner of folk-songs. Invariably all Mahratti folk-songs have soul-stirring themes as their back-ground and every act mentioned therein is expressed as having innate relationship to *Divine Grace.* Whether they refer to such common acts as churning of milk, pounding of grains, drawing of water, ploughing or popular sports and pastimes of the Mahratta race, they are subtly couched in allegorical pattern, promising the singer the ultimate deliverance of the soul from the bonds of '*Samsara*' or wordly ills. These hymns of devotion have as their foundation the theory that the Universe is the body of God and his spirit animating the Universe is the essence of man.

The poems deal with allegoric images drawn from common life and every-day happenings. They picture the perennial contest of the soul with the world. The soul is painfully striving to unleash itself and the world persists in detaining it. These portrayals or images exemplify the long-drawn battle-royal that man is engaged in, in his task of seeking salvation; and in fact every little action of the man in his daily routine is illustrated in this allegorical pattern. They are meant for all people high or low, who want

religious nourishment and spiritual message clothed in popular style and tune. They are either sung alone or by a group of singers with or without accompaniments.

We have a huge collection of such rare and popular hymns and songs in the *Tanjore Maharaja Sarafoji's Saraswathi Mahal Library* from among the works of eminent poets and saints who flourished during the 17th and 18th centuries at the court of the Tanjore kings. The Mahratti manuscripts of this library are chiefly written on hand-made paper of those times. There are as many as 3000 Mahratti manuscripts in this great library and each manuscript in turn contains poems of several authors, and hence the number of poems contained in these manuscripts are several thousands.

To better appreciate Mahratta Saints and Poets who gave the Mahrattas their noble and rich heritage of devotional songs in praise of God in relationship to man and his destiny, it will be worth while studying the growth of the '*Devotional School*' of religion in the Mahratta country which was largely responsible for moulding the character and nature of the poems of Tanjore during the 16th and 17th centuries, when Mahratta rule and influence came to be firmly established in the south. Poets of these periods have left their mark on the religious and the social life of the inhabitants resulting in a rapid growth of '*Bhakti*' cult.

The Poets and Saints who followed Dyaneswar of the 13th century and Namdev of the 14th century appealed to their country-men more effectively than the other schools of Indian philosophy. They preached that God is the ultimate Truth, and Truth the final end of love for all, irrespective of caste or creed. In fact many of them have come from the

lowest ranks of society. They taught that God is love and love is God who will lead them to inner bliss, forgiveness, and equality. They identified love as the seat of Truth and this teaching evolved the ever popular '*School of Devotion*' or *Bhakti*. To them the greatest person is one who looks upon others benevolently as his own-self. The great Saint Dyaneswar, who preceded the Great Shivaji, Ramdoss, and Tukaram who were contemporaries, and in fact every poet who either preceded or followed the Great Shivaji, expounded the cardinal Hindu tenet of love and equality. Their non-discrimination between high and low of either sex has captured the imagination of the warlike Mahratta race. Salvation, they said, is like nature's bounty and is not the monopoly of a privileged class and it can be shared by all who want to share it. This simple but forceful teaching has caused such a revolutionary change in the outlook of the people that they have begun to realise that the gates of Heaven are open even to the most degraded member of society. The soul stirring pieces of the poets have made a direct appeal to the imagination of the race and had such a powerful influence and unifying force that the Mahrattas were welded into one nation during the national upheaval under the historic leadership of Shivaji the Great. They not only unified the race but contributed to the development of '*Bhakti*' cult and thus paved the way for the radical change in the social order. Men and women from all walks of life such as tailors, mahars, barbers, potters, dhobies, traders and untouchables alike flooded and enriched the Mahratti literature with their out-pourings of the heart thus democratising spiritual literature which was once the exclusive privilege of the high-born. Many were born poets and inspired saints great in their respective spheres of treatment of the subjects, and their richness of

language, revealed their spiritual longings and realisation of self in relation to God.

In Mahratti literature especially of the *Devotional School*, the theme usually centres round Lord Krishna or Vitobah and his plays, pranks and manifestations. The Bhagavat, the Ramayan, the Gita and several Hindu Puranas were their main source of inspiration for their songs and hymns. They used several metrical forms of poetry like Abhang, Ovi, Arya, Sloka, Lavani etc. The music of their pieces is unparalleled and wounderful; the diction perfectly rythmic and elegant; the compositions and metaphors quite homely and effective. They bristle with the message of moral enlightenment and spiritual salvation. Their teachings and philosophy enabled this system to survive and adapt itself to all conditions through the changing centuries.

When Shivaji the Great was engaged in his grand plan of founding a great Hindu Empire in India, his illustrious brother Rajah Venkaji founded the kingdom of Tanjore. In its wake, and subsequently after the capture of Ginjee in the south from the Mahrattas by the Moguls, a large number of Mahratta poets flocked to the courts of Tanjore where they were received with open arms by the rulers, and the poets in their turn contributed magnificient literature. The huge collection of Mahratti literature now being preserved in the *Saraswathi Mahal Library* bears ample testimony to their yeoman service to Mahratti literature of Tanjore. At the time when the Mahratta State of Tanjore was founded, Tanjore was passing through a glorious period of literary upheaval. Eminent Telugu, Sanskrit and Tamil Scholars who were authors of brilliant works in polity, astrology, music, dance, medicine and philosophy, in fact every branch of learning, flourished in the courts of Venkaji and his illustrious successors. Telugu

and Sanskrit were at their zenith and it is no wonder that the sagacious rulers paid equal attention to their mother-tongue and patronised several authors. All the Mahratta Rulers without one exception were great scholars and linguists. They have written many works on all branches of Science and Art in several languages.

Numerous eminent scholars flourished in the courts of the Rajahs. A number of women scholars have also contributed their mite to enrich the Mahratti literature. It will be significant to mention a few of them. During the period of Venkaji (1676-1683) who founded the State, Gopinath, Naganath, Krishna Doss author of "Katha-saramrta," Narasimhatmaja the author of Tripura Champu and several other works, flourished at his court.

Shahaji II (1684 - 1710) who was justly named "Abhinava Bhoja" for his accomplishments, patronised at his court, Kesiraj author of 'Garbha-Gita,' Vignanamrta and several other works, Sridharaswami author of Vedanta-Surya, Krishna author of a tika on Gnaneswari, Madhavaswami author of many treatises on Bhagavath and Ramayan, as well as full Mahratti versions of Bharat and Bhagavat, Renuka Doss author of Sriyalacharitra, Krishna Doss Mudgal, author of "Ramayana", Nana Joshi and many others.

Maharaja Shahaji himself has written numerous works in Mahratti, Sanskrit and Telugu, besides songs and padas. For some he has adopted the pen-name of Thiagesa, Thiaga-bhupa, he being a great devotee of God Thiagaraja of Tiruvarur on whom he has composed hundreds of songs. A few of his folk-songs in Mahratti are included in this publication and his name is given as "Thiagesa". His

Mahratti dramas twelve in number form a glorious contribution to the literature of Tanjore.

The court poets of Sharafoji I (1711-1728), the author of the Sanskrit work "Raghava Charitram," were Bhagavantha-Raya, author of 'Sachidananda Vilas,' Raghunatha, author of 'Naraka Varnana' and several other works; Raghunathadoss, author of 'Rukmini Swayamvara' and others.

His brother Maharaja Tulaja I ( 1729-1735 ) was an eminent scholar in Sanskrit whose works are 'Sangeeta-Saramrta,' 'Natyavedagama,' Dhanvantari Saranidhi, Dhanvantari Vilasa, 'Inakulatejonidhi' and 'Inakulavakyamrta'. They are works on music, dance, medicine and astrology in Sanskrit. His works in Mahratti, Bahulakathachurnika, Awichararamaniya Katha and several chapters on Neeti Shastra are noteworthy. Mahratti poets of his court were Mallardoss author of 'Pavanavijaya', Kesavaraj author of several Bodhpar Slokas, and Ghana Shyam, author of 'Shanmuga Leela'.

King Pratapsingh (1741—1764) was a distinguished scholar in Mahratti. His contribution to Mahratti literature is significant. His works are far more numerous. 'Krishna manjari' ( Bhágavat ), 'Umasamhita' 'Ramadinacharya' and 'Madanasanjivana' (Sexuology) are some of his best works in Mahratti. Besides, his twelve dramas in Mahratti mostly on puranic subjects are some of his brilliant contributions.

Jagannatha Bhat, and Triyambaka Bhat, and Ramakrishna Kavi were some of the Mahratta Poets of his court.

Among the notable Mahratti Poets of the Court of Raja Tulaja II (1765—1787) mention may be made of Rama Pandit, Krishna, Shesha, Gangadhar, Vasudeva, Madhavatmaja, and Karaputla Ratnakar, who have also enriched the literature.

## RAJA SARAFOJI-II (1800—1830)

He was by far the greatest monarch of Tanjore, and his legacy to posterity is the Great Library at Tanjore. His patronage of art and literature is proverbial. He was a linguist and knew Sanskrit, Tamil, Telugu, Mahratti, English, French, Latin and German. He wrote several works in Sanskrit and Mahratti. His eight dramas in Mahratti are considered to be among the best.

Veereswar, Parthasarathi, Mukundraj, the versatile scholar, Meruswami to whom hundreds of Mahratti works on Bhagavat and Ramayana are attributed, Virupaksha, Govindakavi, Rakmaji Pandit, Ambaji, Vasudeva, Sridhara Dhundisutha, and Ramasakha were some who enjoyed his bounty and patronage.

His son, Rajah Shivaji, the last ruler of Tanjore, (1800-1855) was equally a patron of arts and literature. He is credited with the authorship of the Mahratti Drama 'Natesa Vilas'. Venkoba, Kale Rao Appa and Prathaparama were some of his distinguished court-poets in Mahratti.

Hundreds of other luminaries in Mahratti whose dates are not known have contributed thousands of songs and padas during the entire reign of the Mahratta Rajas extending over a period of three centuries. Besides, numerous women-scholars and poetesses flourished during their reign. Prominent among the women are Rajayee, Gunayee, Muktayee, Venu Bai, Vita Bai, Renuka, Guna Bai, Nagabai, Tulasi, Bahini, and Amanya, who have contributed songs of the devotional type of Padas, Slokas, Abhangas, Ovyas and Aryas on different subjects of absorbing interest.

Rajah Shivaji was the last of the rulers of Tanjore and with his death in 1855, even the use of Mahratti as the State language of accounts, not to speak of its use for literary productions, was abolished and it is now fast disappearing as a written language in Tanjore inevitably to cease as a spoken one, unless new impetus is given to keep going the spoken dialect.

Preserved in this Sarafoji's *Saraswathi Mahal Library, Tanjore* are several hundreds of superb pieces of folk-songs bristling with allegoric and instructive similes. They are the products of great men and women of three centuries. The pieces are grand and majestic in their treatment of subjects. One is amazed at the number and variety of subjects chosen so much so that one finds him-self bewildered in selecting pieces for publication. The pieces now selected for publication in this book are not the only best pieces, for in fact every one of them is worth publishing. The stumbling block one confronts with in achieving this ambition is finance.

However, this aspect of the problem is greatly mitigated by the generous grant given by the Government of Madras for publication of some of the Mahratti manuscripts contained in this Library, and the Mahratti speaking public are really thankful to the Madras Government for the help.

My thanks are due to the Madras Government, to Sri Chandrasekaran, Curator Oriental Manuscripts Library Madras, to Sri S. Gopalan B. A., B. L., Hony. Secretary and other members of the Staff of this great Library for their help in getting this book published.

Tanjore }
25—5—50 } *A. Krishnaswami Mahadick*

## ॥ अनुक्रमणिका ॥


| पदें. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | प्रार्थना | १ |
| २ | अभिनव बारा मास | २ |
| ३ | उमान | ११ |
| ४ | कांडण | १७ |
| ५ | कृषी | १८ |
| ६ | खेळ | १८ |
| ७ | गुरु गारुडी | २० |
| ८ | गोंधळ | २१ |
| ९ | घुसळण | २४ |
| १० | चेंडु | ३१ |
| ११ | श्लोक ( चोळी बेतायाचा ) | ३२ |
| १२ | जखडी | ३२ |
| १३ | टिपरी | ३४ |
| १४ | दधि व्यापार | ३७ |
| १५ | दळण | ३८ |
| १६ | दिवाळी | ४२ |
| १७ | नथ | ४२ |
| १८ | नवल | ४३ |
| १९ | नांगर | ४६ |
| २० | नांद्या | ४७ |
| २१ | नौका | ५० |
| २२ | पाँखरू | ५२ |
| २३ | पिंगळा | ५३ |
| २४ | पिंगा | ५७ |
| २५ | प्रेमदोरी | ५९ |
| २६ | फुगडी | ५९ |
| २७ | बुद्धीबळ | ६३ |
| २८ | भोजन (श्लोक) | ६४ |
| २९ | भोजन | ६५ |
| ३० | रंगारी | ६६ |
| ३१ | राहाट | ६६ |
| ३२ | वावडी | ६८ |

३३ विंचू ६९
३४ विटीदांडु ७१
३५ विनोद ७२
३६ व्यापार ७२
३७ सासु सुनाचें भांडण ७३
३८ हमामा ८०

॥ श्री ॥

# ॥ लोक गीत ॥

(॥ नीलकंठसुत कृत ॥)

## ॥ प्रार्थना ॥

रामचंद्र बैसले सिंहासनी ॥
दक्षणेसी लक्षुमण चापपाणी ॥
अर्धांगी शोभे जनक जननी ॥
पुढे उभा मारूती ओडूनीया ॥ १ ॥

जये जये राघव रघुनंदना ॥
दशरथसुत राजीवलोचना ॥
ऐसा राम देखीला अयोध्यापुरी ॥
सुरवर दाटले शरयु तीरी ॥
क्रीडावळी वर्णीती वेद च्यारी ॥
हेमताटी आरती करीती नारी ॥ ॥ २ ॥

राघव रघुपती करूणसिंधु ॥
भक्तजनवत्सल अनाथ बंधु ॥
चरणी तारिली गौतमाच्या वधु ॥
नीळकंठसुत रामनामी ॥ ३ ॥ ७ ॥

॥ श्री ॥

(॥ रुक्मांगद कृत ॥)

# ॥ अभिनव बारा मास ॥

॥ श्लोक ॥

गुणवति पति गावां जातसे सर्वथां तो ॥
अतिशय बहु केला जाहलाकीं वृथातो ॥
सजणि जन समस्तां जाहलाकीं तमासा ॥
निजपतिविण कंठू काय या चैत्र मासा ॥ १ ॥

॥ दरू ॥

चैत्रमास सय्ये महा थोर शोभे सुंदर ॥
बहु कानन विलसे ॥
चंपक तरूवर फुलती ॥
पीक बोलती ॥
भ्रमर फिरती उल्हासें ॥
हलुहलु सखि मळयानीळ ॥
वाहे शीतळ ॥
मज कांहिं न सोसे ॥
घरो घरिं गुढीया उभारीती
सण करीती ॥
नित्य आनंद ऐसे ॥ २ ॥

हरी हरी विरह न सोसवे ॥
लागली सवे ॥ ध्रु ॥

॥ पल्लवी ॥

॥ श्लोक ॥

मधुर मधुकरांचा ऐकता शब्द कानीं ॥
विकळ हृदय माझें होतसे कीरवाणी ॥
झडकरि सखियानो भेटवा माधवासी ॥
पति विरहित कंठू काय वैशाख मासीं ॥ २ ॥

॥ दरू ॥

वैशाखमास हा सहज ॥
आलि अखतीज
सण करीति सकळ ॥
प्रत्यहिं पानक पूजन ॥
करीति जन ॥
कोण पाहुं सकळ ॥
आजि राजीवदळलोचन ॥
दुःखमोचन ॥
केवि कोठें राहील ॥
भोजन फलहार सारील ॥
श्रम हारील ॥
कैसा सखीये हें न कळे ॥
हरीहरी विरह न सोसते ॥
लैंगली सवे ॥ ध्रु ॥

॥ श्लोक ॥

दिनमणि किरणानीं दीनतां आणिलीवो ॥
रमणि मणि शरीरा राजसे न्याहळीवो ॥
विरहभर विशेषें धीर नाहिं जिवाला ॥

विमल कमल नेत्रे मास हा ज्येष्ठ आला ॥ ३ ॥

॥ दरू ॥

ज्येष्ठमास पहा आलासे ॥
आजि राजसे ॥
वटसावित्रि सण ॥
भणभणीतें निज मंदीर ॥
ऐकें सखीये वचन ॥
विरहभरें जीव तळमळी ॥
मज न्याहळी ॥
वेळ वाटे कटीण ॥
तापतिकीं सुर्यकिरणें अति सुंदरे ॥
महा दारूणे ॥
माये साहेल कोण ॥ ३ ॥
हरीहरी विरह न सोसवे ॥
लागली सवे ॥ ध्रु ॥

॥ श्लोक ॥

पतिविण सुख दाता कोण या भूतळीं किं ॥
किति ह्मणुनि शिणावें घोण म्या घातली कीं ॥
पळभरि धरी मातें जीव माझा मुराला ॥
शिव शिव कसि कंठू मास आषाढ आला ॥ ४ ॥

॥ दरू ॥

आषाढमास हां संपूर्ण गेला दारूण ॥
सण ठाणवयीचा ॥ घोण सखी म्या घातली ॥
आजि भूतलीं ॥ काय बोलुं मी वाचा ॥

जीवाच्या जीवना वांचुनी काय वांचूनी ॥
प्राण व्याकूल साचा अळिवेणी पळभरी मज धरीं ॥
शीणतें भारीं ॥ सुख वैभव कैंचा ॥ ४ ॥
हरीहरी विरह न सोसवे ॥ लागली सवे ॥

॥ श्लोक ॥

गगन सघन जालें येतसे पाउसाळा ॥
मदन उदय मझ्या अंतरी पूर्ण जाला ॥
सुपति कुसुमशय्या येत नाहिं मनाला ॥
सुपतिविण करी मीं कंठू या श्रावणाला ॥ ५ ॥

॥ दरु ॥

श्रावणमास हा वल्हाळे ॥ सण भरले ॥
नागपंचमि आली सोमवार शिवपूजन ॥
करीती जन ॥ काय बोलुं नव्हाळी ॥
मंगळगौरि घरोघरीं होती सुंदरी ॥
भेटवी वनमाळी ॥ लागवेग करिं माउली ॥
माझी साउली ॥ वेंगी आणि ये वेळीं ॥ ६ ॥
हरी हरी विरह न सोसवे ॥ लागली सवे ॥

॥ श्लोक ॥

विरचुनि सुमशय्या ताप हा शांत व्हाया ॥
लवकरि हरिणाक्षी जातसें जो निजाया ॥
तव सखि मादनानें त्या शरिंमार केला ॥
हरी हरी कसि कंठू मास हा भाद्र आला ॥ ७ ॥

॥ दरू ॥

भाद्रपदमास हा आला ॥

जीव काहला ॥
फार जाहलें वाजी ॥
हरिणाक्षि सखि हारितालिका ॥
करिती बाळिका ॥
पुष्पमंटपामाजी ॥
मांडुनियां शिव पार्वती ॥
पूजा करीती ॥
जागरणवो आजी ॥
शिव शिवतां ऐसें कां केलें ॥
आज्ञा विघडीलें ॥
मीं तों दीवस मोजीं ॥ ॥ ८ ॥
हरी हरी विरह न सोसवे ॥ लागली सवे ॥

॥ श्लोक ॥

विकसित कमला ते पाहतां पूर्णदृष्टी ॥
निजपति वदनातें आठवी चित्तकष्टी ॥
सदय हृदय माझ्या भेटवीं वल्लभासी ॥
दिवस तरि कसे मी कंठू आश्वीज मासीं ॥ ९ ॥

॥ दरू ॥

आश्वीज मास नवरात्र ॥
दिवस विचित्र ॥
आले साजणी पाहिं ॥
कुलदैवत घटस्थापना ॥
तोष ब्राम्हणा ॥
मज उल्हास नाहीं ॥
कोणिंह तरीं तुम्हि बायका ॥

प्राण नायका ॥
थेटवा लवलाहिं ॥
यावरिं प्राणहा राहीना ॥
विरह साहीना ॥
सोसना मज कांहिं ॥ १० ॥
हरी हरी विरह न सोसवे ॥ लागली सर्वे ॥

॥ श्लोक ॥

नव नलिन दळांचा सोसना सीतवारा ॥
नमन करितसें मीं होतसेकीं उबारा ॥
हृदय उलत आहे पाहतां चांदण्यासी ॥
सुदति पतिस वेगीं आणि कार्तीक मासीं ॥ ११ ॥

॥ दरू ॥

कार्तिक कैसा कंठावा ॥
आला पाडवा ॥
दीपावळि जनासी ॥
बीज पंचिमी सण करीती ॥
दीप लाविती ॥
द्वादशीचेवो दिवसीं ॥
सांजेसि तुळसी पूजन ॥
वन भोजन ॥
माझी आवस्था ऐसी ॥
पतीरूप सर्वत्र बाणतें
मन शीणतें ॥
विरह सोसुंवो कैसी ॥ १२ ॥
हरी हरी विरह न सोसवे ॥ लागली सवे ॥

॥ छ ॥

॥ श्लोक ॥

अति परिमळ सख्ये पुष्पगंधादि नाना ॥
विपरित मज जालें साजणी सत्य माना ॥
पसरूनि पदरातें मागतें मीं तुह्मासी ।
विसर न करिं नाथा भेटवीं मार्गशीर्षि ॥ १३ ॥

॥ दरू ॥

मार्गशीर्षमास सकळासी ॥
जन लोकांसी ॥
पाहें आनंद होती ॥
चांपेसष्टि सख्ये आलीसे
महा उल्हासें ॥
सण अवधेहिं करीती ॥
मजतरी कांहिं न सुचतें ॥
मन खोंचतें ॥
दिवसेंदिवस सुदती ॥
गहिंवेंर निज कंठ दाटतो ॥
मोह लोटतो ॥
फार लागली खंती ॥ १४ ॥
हरी हरी विरह न सोसवे ॥ लागती सवे ॥

॥ श्लोक ॥

जडित कनक वस्ता भार होताति मातें ॥
घडि घडिस अवस्था काय बोलुं तुह्मातें ॥
बहुत दिवस जाले पाहुनी श्रीहरीसी ॥
कठिण दिवस जाती साजणी पुष्य मासीं ॥ १५ ॥

॥ दरू ॥

पुष्यमास अति शोभतो ॥

जीव लोभतो ॥
नगर नागर नारी ॥
नवीं नवीं नेसुनि लुगडी ॥
घेती सुगडी ॥
कुंके रंगुनि सारीं ॥
पंकज लोचना सुंदरी ॥
प्रति मंदिरीं ॥
जाती देताति भारीं ॥
नव नव पानाचे वीडे ॥
देती सुगडे ॥
दिवस आनंदकारी ॥ १६ ॥
हरी हरी विरह न सोसवे ॥ लागली सवे ॥
॥ छ ॥

॥ श्लोक ॥

नयन लवतसेकीं साजणी आजी डावा ॥
नळिन नयन माझा स्वामी दृष्टी पडावा ॥
शकुणहिं सखियानों सांगता निश्चयेसी ॥
ह्मणउनि मज वाटे धीर या माघ मासीं ॥ १७ ॥

॥ दरू ॥

माघमास आला कामिनी ॥
गजगामिनी ॥
पति वाट मीं पाहें ॥
डावा डोळा माझा लवतो ॥
शुभ भावतो ॥
काक बैसुनि बाहो ॥

शकुण सखी जन सांगती ॥
येतसे पती ॥
स्फुरे सुंदर बाहे ॥
ह्मणउनि मज धीर वाटतो ॥
हरिख दाटतो ॥
हेतो सत्यचि पाहें ॥ १८ ॥
हरी हरी विरह न सोसवे ॥ लागली सवे ॥

॥ ७ ॥

॥ श्लोक ॥

निरखुनि सुखदाता स्वामि रुक्मांगदाचा ॥
हरिखुनि हरिणाक्षी बोलतां नम्र वाचा ॥
कवलुनि वनमाळी भेटला आदरेंसी ॥
अभिनव रति रंगें कंठिनि फाल्गुणासी ॥ १९ ॥

॥ दरू ॥

फाल्गुण मासीं सुंदरी ॥
भेटतां हरी ॥
शोक टाकुनि रमणी ॥
अभीवर तीरसें माजली ॥
अती साजली ॥
हरिखें लागुनि चरणी ॥
रुक्मांगद विभु नायका ॥
सुख दायका ॥
पूर्ण जालीशिराणी ॥
नवस आर्जि माझे पुरले ॥
श्रम हारले ॥

बोले मंजुळ वाणी ॥ १९ ॥
हरी हरी विरह न सोसवे ॥ लागली सवे ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ अभिनव बारा मास संपूर्ण ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्री: ॥

( त्यागेशकृत ॥ शहाजीराज कृत ॥ )

## उमान पद ॥ (भाव पद)

॥ राग ॥ ॥ ताल ॥

तुजसीं संग कोण करील ॥ प ॥
आलिंगनास अधिकार नाही ॥
अभिसुख अस्तां लाजतोस ॥
वेला उल्लंघी कोप तुझा ॥
विकट रूप तुझें या करीतां ॥ १ ॥
धनाढ्यदातरीस भीक मागतोस ॥
वनिता तर पराधीन करितोस ॥
अनुदिन जारत्वरीति नेणेस ॥
अस्वतंत्र तू याकरितां ॥ २ ॥
वर बुद्धि नाही तूज
सरस अधरपान देईल कोण ॥

हरत्यागेशा मित्र तूं म्हणुन ॥
अगज केली मज सारखी ॥ ३ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ १ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

( शहाजी ॥ त्यागेशकृत ॥ )

## ॥ उमान पद ॥

॥ राग ॥ ब्यागड ॥ ॥ ताळ आदि ॥

ज्ञानी ब्रम्हवेत्ता नव्हे आज्ञानी पंडित ॥ प ॥
कुसुम सुगंध नव्हे ॥
कोकिल काक होईल ॥
शशधर सीतल नव्हे ॥
चंदन उष्ण ॥ १ ॥
असूर भीकर नव्हे ॥
अंबर वसुमती होईल ॥
वसुदाता दीनरक्षक नव्हे ॥
वाचाल मुंका ॥ २ ॥
भोग सुखकर नव्हे ॥
भूजन निर्जर होईल ॥
त्यागेश भक्त सर्वज्ञ नव्हे ॥
नाग वाद्य स्वरूप ॥ ३ ॥
॥ ९ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ त्यागेश कृत ॥ शहाजी राज कृत ॥)

## ॥ उमान पद ॥

(॥ अत्रागमनमद्भुत ॥)

वेगी उमानें सांगाहो ॥
वेदवेद्यहो ॥ धृ ॥
निश्चय टाकितां ते ॥
निर्मल दीक्षित होतातिके ॥
द्विज कोणते सांगा ॥
भजतां ते शूद्र दासीस ॥ १ ॥
सकल संग टाकून ॥
सज्जन धर्म सांगतां ते ॥
अकलंक वैश्य धन ॥
आपण लुटितां ते कोण ॥ २ ॥
धात्रीयादि तिन्ही लोकधुत ॥
पाप करणार कोण ॥
क्षेत्रिय पादतीर्थविना ॥
सामर्थ्य नाहीं कोणास ॥ ३ ॥
मांस रूचि पाउन द्विज
मांसदात्या हित करितो ॥
आस फार त्यास तो कोण ॥
आजि सांगा त्यागेशा पुढें ॥ ४ ॥

## ॥ यालरांडे ॥

विपरित पहा अवनीवरी किती ॥ धृ० ॥
कमल धरणीवरि दिसूं लागली ।
कमली कमल प्रबलली ॥
कमली कमल शोभलीं ॥
कमल अमाद विकसलीं ऐसे ॥ १ ॥
चंद्र दोनि उगवले दिव्य ॥
चंद्र पाहा खालवरी झाले ॥
चंद्र चंद्रिका मिळाले ॥
चंद्रें चंद्र जिंकिला ऐसें ॥ २ ॥
आकाश धरणीं चुंबुं लागले ॥
आकाश प्रगटी दिसूं लागले ॥
आकाश चलनें आल्हाद झाला ॥
आकाश केश त्यागकुंभेस ऐसें ॥ ३ ॥ ७ ॥

श्रीराम वसुदेव प्रिया ॥
शिव स्वरूपा ॥
भूरि मायासक्ता ॥
मज पोषण करि देवेशा ॥ धृ० ॥
सरस अयोध्या मथुरा वनी
धर शोभमाना ॥
सुरुचिररुचि नीलकंधरा ॥
कलाप सुंदरा ॥ १ ॥
सुमुख गुहांचित नवनीत ॥
सुभ दर्शनानंद ॥
शमितसुमनोबाणमहा ॥
शरभंग कांता ॥ २ ॥

घनविदिता वृषभासुर ॥
कांड समाश्रित ॥
विनंति हरि सूनासि ॥
रमणी भासितांगा ॥ ३ ॥
गुरू महा अहिल्यादर ॥
गोचरं हंसकुळ ॥
शरदि पूर्णिमा ॥
चंद्र शाहा पाल त्यागेश ॥ ४ ॥ छ ॥

## ॥ धन्य लौधुरू ॥

भाव सांगाहो ॥ भाव सांगाहो ॥ भाव सांगा याचा ॥ धृ० ॥
पक्षी सारे मिळुन ॥
बक-याचे कान भक्षुन फिरतात ॥
पाहा हो ॥
लक्ष बक-याचें
ललित सिर हरून ॥
दक्ष कोल्हा येक ॥
तांडव करितो ॥ १ ॥
बेडुकावरि येक ॥
येडक्याचे कानीं ॥
उडतो बहुतर उल्हासें ॥
बेडुकास पाहून प्रिय गीत गाउन ॥
जोडुन फणसर्पा स्तुति करितात ॥ २ ॥
म्हातारी वानरी ॥
म्हातारा कोल्हा ॥
रात्रंदिवस रमू नमे भूत येक त्यास ॥
भूरि जन्मुन ॥
भूतली जन पोसितो त्यागेशा ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

माया विना पुत्र ॥
घन राक्षस येक ॥
गगनी उपजला तो ॥
कोण सांगा ॥ त्या ॥
विनतराक्षस येक्या ॥
विंचानें खादलें तो कोण सांगा ॥ १ ॥
गरूड येक बाल खांडीले ते ॥
कोण सांगा ॥ त्या ॥
गरूडावरि बहुतर बाण झाले ते ॥
कोण सांगा ॥ २ ॥
केळीचें झाड येक ॥
शेळीचे जिव्हेवरि तें कोण सांगा ॥
ते केळीचेंझाड मोद किति करिते ते कोण सांगा ॥ ३ ॥
वानर येक विष वांछितें ॥
विशेंष तें कोण सांगा ॥
त्या वानरा येक सिंह वाहतो तो कोण सांगा ॥ ४ ॥
बैल येक सोनाराचा ॥
बालस्रृंगीं वाहतो ॥
तो कोण सांगा ॥
त्या बैलासि कोल्हानें बळें कुन धरिलें ॥
ते कोण सांगा ॥ ५ ॥
सरस थोंसला शाहा ॥
धरणेश कुलदेव त्यागराज्या पुढें ॥
वर बुद्धिप्रकाशे ॥
सर्व नामांतरज्ञा आसे सांगा ॥ ६ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ अनाम कवी ॥)

## ॥ कांडण ॥

कांडण वैराटीका ॥ येयीवो सखीये आह्मी दोघी कांडु ॥
देह उखळ मांडु ॥ सोला कली ॥ ध्रु ॥

आसुमा वोवीये बुधी बरवीये ॥ धृती प्राणसखीये ॥
सांग तीणि ॥ १ ॥

प्राण हे मुसळ ॥ बुधी धरूं हाती ॥
संवाद कांडीती ॥ तया दोघी ॥ २ ॥

लोभाची ढेकुल वेचुनीयां चीत ॥
कृष्णमणि येथ सांडीयेली ॥ ३ ॥

अभीलाषाचे गोड घालुनि सौरस ॥
भलीहो डोलस ॥ बुधी होसी ॥ ४ ॥

विषयाचा कोड फेहुं वेगळा ॥ काम क्रोध हारला ॥
वेचीयेला ॥ ५ ॥

मन हे तांदळ वेचुनी घेतला ॥
शास्त्राचे खट केला ॥ निर्धारेसी ॥ ६ ॥

शुल्ध सत्वाची ये हाडी ॥ आधण घातला ॥
आग्नी प्रज्वालीला ॥ मुळीहूनी ॥ ७ ॥

आज्ञानाचा कढा पुनः पुन्हां येती ॥
आधण जळती रज तमाची ॥ ८ ॥

॥ श्रीः ॥

(॥ केशव कृत ॥)

## ॥ कृषी ॥

निजधैर्य नांगर धरूणी ॥ मोहो खुंट काढीला सांडुनी ॥
ज्ञान भक्ती वैराग्ये ती फणी ॥ आती सुध केली हेम दीनी ॥ १ ॥

श्रवणाचें चाड हे धरीलें ॥ गुरू मुखेंनी ॥ बीज पेरीलें ॥
सभावाचा वर्सला नीज घमनें ॥ परिपूर्ण पिकले चैतन्ये ॥ २ ॥

तेथे सत्व सोकारा राखणें ॥ कर्मपक्षी हाकी तो आपणें ॥
निजबोध पिकले सेतहो ॥ स्वानंदाच्या घुमारी येतीहो ॥ ३ ॥

आनंदाच्या रासी ह्या होतीहो ॥ सद्‌गुरू कृपे केशवी घेतीहो ॥ ४ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ शामदास कृत ॥)

## ॥ खेळ पद ॥

खेळे खेळे नाटक चक्रपाणीरे ॥
शरीर पञ्च भुतांची हे मेदनीरे ॥
वीवेक नांगर भोंवतां शीरोमणीरे ॥
ध्यान श्रवण साधन गात्र फणीरे ॥ १ ॥

आली कणसें ज्ञानाचीं घनदाटरे ॥
खातां गोड बहुत सुख वाटेरे ॥
नाहीं देह मयेचा कडबा तुटेरे ॥
भेद् खेदे धसाचें बळ तुटेरे ॥ छ ॥

जप तप वृषभे चालती झड झडारे ॥
प्रपञ्च कसपट अवघाहि् केला रगडारे ॥
वोढुनी दृढ बांधला हरूश नाडारे ॥
धीर कुणबी हाकीतो पाई गाडारे ॥ २ ॥

विकल्प मोहो पाषाण थोर होतारे ॥
सदेहे सांडे लागली असंख्यातरे
काम क्रोध पर्वत चंड तेथेरे ॥
बोध शास्त्रें मर्दिलें सकळीकांतरे ॥ ३ ॥

आशा ममता कल्पना काशा गुंतरे ॥
त्याहीं गेल्या उडवील्या चूर्ण होतीरे ॥
भूमिका शुल्ध करीतसे निज भक्तीरे ॥
पातक खडे वेचुनी टाकी शांतीरे ॥ ४ ॥

निष्ठा बीजें पेरीले चहुंकडेरे ॥
पीक पिकलें अद्भुत वाडें कोंडेरे ॥
साधु गोडी घेतील ते नीवाडेंरें ॥
यरां भ्रांती दु:खांचे सांकडेंरे ॥ ५ ॥

विस्वाचे आटोळे उंच कैसेरे
त्यावरी प्रेम बैसोनी सावकाशेरे ॥
हाती गोफण सत्वाचे शोभतसेरे ॥
भाव गोटा सोज्वळ दिसतसेरे ॥ ६ ॥

जाहली तृप्ती अनुभव हुरडा घेतांरे ॥
वीरक्त रस मोडलें गा तत्वतारे ॥

घोर चिंता जाहाली माझी वेथारे ॥
शामदास सेवितो गुज आतांरे ॥ ८ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ गुरूराज कृत ॥)

## ॥ गुरू गारूडी पद ॥

आणा गुरू गारूडीवो ॥
उत्तरील जन्म मृत्ये भवडीवो ॥ धृ० ॥
अहंत्यचा वीखारवो ॥
येका येकी थोरवो ॥
आला झोंबला पाई फोरवो ॥ १ ॥

विशयाच्या वीशेंवो ॥
सर्व तननुशोश वो ॥
तेणें स्वसुखा होता नाशवो ॥ २ ॥

ममतेचा झेंडुवो ॥
येतो कंठ कोंडुवो ॥
कवणु पाहाना ऐसा पोडुवो ॥ ३ ॥

गोड कडु झालावो ॥
कडु रूची आलावो ॥
भ्रांती मन भ्रमणि पडलवो ॥ ४ ॥

हरी हरा काजवो ॥

आला गुरूराजवो ॥
निरसुनी वीश हे कळे चोज वो ॥ ५ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ आत्मनाथ कृत ॥)

## ॥ गोंधळ पद ॥

औट पीठ मुळ वळणी अंबा नांदते तेथे ॥
निजरूप सिद्ध योगीणी निरालंब जेथें ॥
करी त्रीशुळ त्रीगुणांचा बारा सोळा सांगाते ॥
शडदळ त्रीदळ भेदुनि काये वर्णाति येते ॥ १ ॥

सुन्ये गोंदळ खेळ स्वामिणी इछा आपुली खेळे ॥
अभय हस्त करी याचका दावि मुळ कमळ ॥ छ ॥
आकार रक्त बीज वधीळा मुळी नाहीच केला ॥
शुंभ निशुंभ दोन्ही मर्दिली द्वैत ठाव पुसिला ॥
भक्ता पाहे कृपा दृष्टीन तेथे सौरस झाला ॥
येकायेकी दृष्टी मिळउनि दावि आनंत लीला ॥ २ ॥

निजपद दायक अंबिका नित्ये करूणा कुमारी ॥
मुळीहूनि आंतवरी हे वोवी येकची दोरी ॥
आत्मनाथा आंबा प्रसन्न ॥
ज्ञान जोती साजीरी ॥
निळानंदा तेथे उदयो उदो म्हणा वैखरी ॥ ३ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ आनंतमूर्ती कृत ॥)

## ॥ गोंधळ पद ॥

निर्गुण निराकारा ॥ आदिमातें मूळाधार वो ॥
अकक्ष सर्व सारें ॥ चिदानंदे अपरांपरे वो ॥
ब्रम्हीं तेजाकारें ॥ महाकारण तुं ॐकार वों ॥
अंबा ऋषि कैवारें ॥ पूर्ण अंश दश अवतारे वो ॥ १ ॥
उदो म्हणा उदो म्हणा ॥ वैष्णवि माउलिचा वों ॥ उ ॥ धृ ॥

शिवे वरदे वेधलें ॥ असुर संखासुर मातला वों ॥
चतुरानन गांजिला ॥ वेद च्यारी घेउनि गेला वों ॥
सुरपति हा त्रासला ॥ तव तो तुजला शरण आला वों ॥
मगतां तो साधिला मीन रूपे वधतां केला वों ॥
उदो म्हणा उदो म्हणा ॥ मछाई माउलियेचा वो ॥ उ ॥ २ ॥

सुरा असुराचे कुळि ॥ अवनि भारे हे दाटली वों ॥
शेषान वत्रे धरिली ॥ तव ते पाताळा चालिली वों ॥
नेणे भयभित जालि ॥ तुजला करूणा हे दाविली वों ॥
मगता कछप वेशे ॥ पृथ्वि पृष्टीवरी वाईली वों ॥
उदो म्हणा उदो म्हणा ॥ कूर्माई माउलीयेचा वों ॥ उ ॥ ३ ॥

असुर कुळलि मागुता ॥ पिळोनि पृथ्वि केला भारू वों ॥
शेष कुर्म भागले जाणोनि ॥ घेसील तुं अवतारू वों ॥
अभिनवलीला तुझि ॥ केला सकळांचा संव्हार वो ॥
मगतां सुकर वेशे ॥ दाढाला लाउनि दिधला धीर वों ॥
उदो म्हणा उदो म्हणा ॥ व-हाई माउलियेचा वों ॥ उ ॥ ४ ॥

असुर कुळीं जन्मला ॥ भक्त प्रल्हाद बोधला ॥
छंदे तुझें लागला ॥ देखोनि पितयाने गांजिला वों ॥
नामे निर्भये जाला ॥ तवें स्तंभि उद्भव केला वों ॥
जानुवरि घेतला ॥ हिरण्य नखें विदारिला वों ॥
उदो म्हणा उदो म्हणा ॥ नरहरि माउलियेचा वों ॥ उ ॥ ५ ॥

भेदुनि सुरनर फणि ॥ असुर गर्वि जाला बळि वों ॥
सुरपति शरण आला ॥ म्हणें तूं राखें हे मैथुलि वों ॥
त्रिविक्रमाचा रूपें ॥ तो तां दडपिला पाताळि वों ॥
उदो म्हणा उदो म्हणा ॥ वामने माउलियेचा वो ॥ ६ ॥ उ० ॥

भृगु रूषीचा कुळि माते ॥ अंबेचा उदरीं वो ॥
अवतारू घेतलों फरशरामें तां सुंदरि वों ॥
सहस्त्रार्जुन मारिला ॥ तोतां मातें कैवारि वों ॥
पृथ्वि येकविसां वेळा ॥ फिरोनि क्षेत्रकुलें संव्हारिवो ॥
उदो म्हणा उदो म्हणा ॥ भार्गव माउलियेचा वो ॥ उ ॥ ७ ॥

पाहतां परात्पर पूर्ण ॥ रामाई अवतारा वो ॥
वनवासाच्या मिसे ॥ केला दशकंदा संव्हारू वो ॥
सोडुनि सुरनर माते ॥ राजि स्थापीला किंकरू वो ॥
भानुकुलि अवतार ॥ नाम सौंसारिचें तारू वो ॥ उदो० ॥
रामाई माउलियेचा वो ॥ उ ॥ ॥ ८ ॥

नंदा यशोदे धरिं ॥ गोंदळा माझारि वो ॥
अनंत देही लीला ॥ खेळे कान्हाई सुंदरा वों ॥
बाळपणी मारिला ॥ मामा कौंसासुर हा वैरिवों ॥
पांडव करूनि पुढें ॥ भारू पृथ्विचा निवारि वों ॥ उदो० ॥
गोपाळे माउलियेचा वो ॥ उ० ॥ ॥ ९ ॥

बोधुनि सकळहीं लोक ॥ बोधे नेले त्रिविध शोक वो ॥
बौध्यपपानांदसि ॥ बोलें विणंतु बोले येक वों ॥

सौघाका साधिति बोधे ॥ तेथे अनेकपण येक वों ॥
बौध्यावतार तुझा डोलें ॥ लाउनि सकळहि देखे वो ॥ उ० ॥
बोध्याई माउलियेचा वों ॥ उ० ॥ १० ॥

नवल कलुंकि माता ॥ वेद साक्षिदा पंथा वों ॥
भिन्नपणे भाविता ॥ भिन्न भिन्न चढे हाता वों ॥
व्यापक जे भाविति यातें ॥ जवळी ते तंवठायां वों ॥
कुटिलपण खेळते ॥ भुरळें घालुनि फिरवि चिंता वो ॥ उ० ॥
कलंक माउलियेचा वो ॥ उ० ॥ ॥ ११ ॥

येकिच निजमाउलि ॥ दांहिं अवतारि खेळलिवों ॥
अनंत देहे लीला ॥ पूज्य पूजक आपणी ज्ञालि वों ॥
गुरूवचनें पाहतां ॥ ते मी मज माजी बिंबलि वों ॥
आनंत मूर्ति चिंतणें ॥ मूर्तिपना निमालि वो ॥ उ० ॥
निज माउलियचा वो ॥ उदो म्हणां उदो म्हणां ॥ १२ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ भोजलिंगस्वामी कृत ॥)

## ॥ घुसळण ॥

ज्ञानि लोचनी पाहें चंद्रावळि नारि ॥
निवणे मांडुनि मुळि दृष्टांत आधारि ॥
अवघा ब्रह्मांडा डेरा करूनि सुन्दरि ॥
घुसळितां स्तंभ मेरू येकविस स्वर्गावरी ॥
आनंदे घुसळि ॥ १ ॥

चंद्रावळि निरोपमा नवनीत काडुनि कैसि परब्रह्मा ॥ आनं २ ॥
महि माझि रिचउनि दहि तले व्यारी ॥

मन्न मातला रवि दृष्टांत अवधारी ॥
पवन बारडि कवणा अधो ऊर्ध करि ॥ आनंदे ॥ ३ ॥

मांडलि गवळणी बुंधु घालुनिया तीनि वोडली
बारडि रवि परतरि उन्मनि घुमतसे डेरा ध्वनि
उमटलि गगनि ॥ ॥ आनं ॥ ४ ॥

स्वरूप सुंदर बाला निर्धारि राहिलि ॥
इंद्रिये मन्न बुध्धि चित्ति घुसळो लागलि
वाजति कंकण करि श्रुति सामावलि सखोले
भृंघार गुरूकृपा उजळलि ॥ आनं ॥ ५ ॥

पाचि घुसळिना महि मथन होते जाले
सावि समाधि नवनीत आले जाणती अनुभवि
तरि तें कोटे समावेल ॥
निवडु गेलि ये तव तन्मये जाले ॥ आनं ॥ ६ ॥

नवनीता काडिता हरि देखीदयले जुंब ॥
चित्त चोरिले जिवा लागले वो ध्यान दृष्टि
खुंटलि मना पटयले मना ॥
निवडु गेले ये तव जुंनेस निधान ॥ आनं ॥ ७ ॥

नवनीतें काढितां हरि देखिले निधान ॥
विकार खुंटले प्रकटलें पद्मनाभ ॥
तत्वातत्वि विलयांगेलें उचललें जुंब भोजलिंग स्वामि
म्हणे हरि जोडला वरि लाभ ॥ आनंद घुसळि ॥ ८ ॥

---

॥ श्रीः ॥

(॥ सिद्धनागेश कृत ॥)

## ॥ घुसळंण ॥

माया मंदीर ममत्व निद्राती मी राधा निरखुनी ॥
साक्षभूत पती सावध करी शुत्ध प्रभे कामनी ॥
आरंबे वो घुसळण घाली सावकाश होउनी ॥
सप्तपाताळे शेष कूर्म तलात शोधुनी ॥
यकवीस स्वर्गे स्तंभ मेरू धर माथा स्थापुनी ॥
रवी शेशी बारडीगे मधे शुत्ध फेर लागुनी ॥
अध उर्धमाजीरीगे जडीली विवेकें करूनी ॥
प्रकृती गुणाचा डेरा ठेविला तळी धीर देउनी ॥ १ ॥

यैसें घुसळणेण अवडी ॥ मांडीलें विचारें ॥
सीकें निज घराभीतरी ॥ लाविलें निर्धारी ॥
त्रिपाद वोलली अधोमुखें ॥ उर्धमुख तीन दोरे ॥
त्यामाजी तीन तीन शक्ती ॥ भरयली त्रिपात्रें ॥
वरी वरी अर्धमान झांकणी ॥ ठेवीली येकाकारें ॥
अणुनी वोत्तीयला रसु ॥ भरूनि शून्ये उदरें ॥
निकट करूनि ज्ञान रवी ॥ धरूनी पवन दोरी ॥
गवळणी घुसळी ते ॥ २ ॥

यैसें घुसळण तिनें सावधान मांडीले ॥
सचित्त कालीचें जे देहेभाव अटलेंरे ॥
प्रारब्धाचा छंदे फोडुनी येक केलेरे ॥
क्रियेमाण करितां येकरूप देखिलेरे ॥

अगम निगम दंडते वोडितां भागलेरे ॥
शमदम मथनीत्ते सुसंगत्त राहिलेंरे ॥
प्रवृत्तीं निवृती चरण दोनी समतत्वी ठेवीलेरे ॥
वीवेक हस्तक घालुनी तिने ज्ञानदृष्टी पाहिलेरे ॥
मग ते गौळणीने काये काये निवडिलेंरे ॥
संती सावधान पाही जे परिसिलेंरे ॥ ३ ॥

यैसी घुसळीत्ते गा गौळणी ॥
सप्तैतल आले शोधुनी ॥
वरी वरी कुभस्ती रासनी ॥
गोरस भरीला चौदा भुवनी ॥
नांदे धुम धुमीताती ध्वनी ॥
तरगं रवी शशी गगनी ॥
तारकलोट सुक्षम फेणी ॥
फेण हा प्रकृतीचा लोटुनी सारिला मागें ॥ ४ ॥

तया सरीसी सप्त पात्ताळे मागें सारिली प्रकृती मेले ॥
वराह शेष कूर्म सारिले सकल परिवारें सहित ॥
चौदा चक्रें चौदा भुवनें सप्तलोक जयाची स्तानें ॥
ते सारिलें वेघळेपणे मथनी निवत्तां समस्त ॥
येकेवीस स्वर्गाचें जे ठाये येक येक निरसिला माये ॥
गवळणी निवडु जाणे सोय करूनी येकाग्र चीत्तें ॥
सरिता सप्तसी निवडिले स्वादे भिन्न भिन्न भासले ॥
गिरी तरूवर सारिलें सकल जडीभूत्त जात ॥
अरे हा ॐकार त्रैलोके तेथे कायसे सकलीक उभार
ब्रह्मांडीचे देख ॥
निरसिला विकारवंत ॥
सुर असुरगण पन्नग इंद्रं अष्टलोक सकलीक ब्रह्मा ॥
ब्रह्मांडेंसी लोक तेथे काय सीमात ॥

नानापथ दर्शण लहरी योग योगाच्या कुसरी ॥
ज्या उद्भवती निमती भीतरी तेथे हारपले द्वैत्त ॥
स्वर वोंकाराचे भेद शास्त्र पुराण वेद शब्द ॥ -
जेथे जाहले नि:शब्द ॥ सगुण निवडिताती संत ॥ ५ ॥
यैसी माया घुसळीते छंदे छंदेरे ॥
निजवृती गुंतल्यां ब्रह्मानंदीरे ॥
मनो भावनी गुंतला तेणें वेदे ॥
जीव जीवन घुसळीते जीवनामधें ॥
साधु संत निवाले तेणे बोधेरे ॥
माया मनते मोहिले गोविंदेरे ॥
चित्तवृत्ती गुंतल्या चिदानंदरे ॥
द्वैत्त वीसरे अवस्था तुटे शब्दरे ॥
जडत्व त्यजुनी घे नवनीत आनंदेरे ॥
झेलीते शुत्धकरी ॥ ६ ॥
यैसा नवनीत कलोल झेलीती दोही करी सर्वांगी सुक सुकाळ ॥
तेथेची तेची उष्णता सहज निमालीकी अंतर झाले सीतल ॥
तेथे माये बाप बंधु सज्जन संपत्ती तेणे सुखे विसरले सकल ॥
तेथे प्रपञ्चाची कैसी विसरली देहबुद्धी मनवृती झाली पांगुल ॥
द्वैताची आठवण नाठवे मी तूपण भ्रांती झाली निर्मूल ॥
शुत्धपात्र तयालागी पाहिजेकी वाहीजे अंत निर्मल ॥
पाहुनि सार सांटविलें नवनीत घुसळण झाले निश्चल ॥
अपपर दोन्ही नाठवे गौळणी झाली निवांत सुसील माया घुसळितेरे ॥ ७ ॥
तीनें माया मदीरत्तलांधारे चुलवण मांडीलेरे ॥
हृश्येवीधण घालुनि ज्ञान अग्नी चेतविलेरे ॥
प्रणव बीज वोंकार स्वरें वायोच्या फुंकीले ॥
कडकडीत कड ज्ञानाचे जाणीव सहज गुण दाटले ॥
निर्मल निवांत होत जात सम निश्चले झालें ॥

अर्धमात्रा साक्ष सूर्य अवस्ते कळले ।।
मन उन्मनी ठेउनी पाहतां दुजेपण तुटलेंरे ।। ८ ।।
तेथे पिंड ब्रह्मांडे हारपली दोन्ही ।।
सगुण निर्गुण नाहीं दिवस रजनी ।।
मथनी कष्ट गेली विसरोनी ।।
निश्ये निद्रा घे निरञ्जनी ।।
तेथे ज्ञान अज्ञान नाहीं उपाधी गुणी ।।
तेथे अज्ञान सिद्धनागेशा ज्ञानी निवांत राहे ।। ९ ।।
येसे घुसळण बहु विध ।। त्रिशून्ये शोधुनीकी माहाशून्या ज्याच्यानी लागें।।
च्यारी भूमी शोधुनीकी राहिली सहज गुरूच्या बोधे ।।
अखंड निजध्यानी ।। गौळणी घुसळिती घुसळण ।।
मानसी विसरोनी ।। निवांत नवनीताच्या सुखें ।।
सुख दु:ख विसरोन ।। मना नाठवे प्रपंच ।।
ते सहज उन्मनीकी ।। तैसा अज्ञान सिद्धनागेशी ।।
अखंड ब्रह्म भुवनी ।। राहे गुरू कृपा ।। १० ।।

।। छ ।। ।। छ ।। ।। छ ।।

।। श्री: ।।

## (।। अनाम कवी ।।)

## ।। घुसळण ।।

नमिन श्रीगुरू चरण नमिन सद्गुरू चरण संत सहजणी ।।
गवलणी घुसळणि आरंबुनि वो ।।
भक्तीनि निवणें मांडिलें ।।
सुत्ध सत्व ठेवउनियां माथणी वो ।।

भरले ब्रह्मरस च्यारी ॥
रिचउनि करि मधे मिळवणि वो ॥
गुरू स्मरणी सावदे ॥
लाउनि लक्षिते निर्गुणी वो ॥
दृस्ये सारूनि गुज न्याहळि वो ॥
अष्ट भावे विनटलि ॥
शब्द पावलि ते बोलि वो ॥ गव ॥ १ ॥

सुमने मन रवि करि अर्ध उर्ध मादिरि ॥
धैर्यस्तंभ उभउनि भारि वो ॥
शांति क्षमा बारडि ॥
ब्रह्मसूत्र वोढियेलि दोरि वो ॥
गगनि उभे वेलहाळी ॥
प्रवृत्त निवृत्त मथन करि वो ॥
डेरा घुमतो अनुहा तें ॥
नाद गर्जत अंबरि वो ॥ गव ॥ २ ॥

पद द्वयत्वं पदत्तपद शोधिले ॥
देहाचे निरशले सबळ वो ॥
कार्या कारण त्यागुनि ॥
ऊर्लेचि भरियेलि सत्वो ॥
येक वटुनि नवनीत ॥
आइके झेलि तम मूरालि वों ॥
गवळणि आ ॥ ३ ॥

ठकुनि ठेविले मन्न चौघे हे मोहन ॥
सांहिं करिताति भांडणे वो ॥
जवळि असतां गोरस ॥
सोहे नेणति अंध जने वो ॥

गुरू कृपा लाधलि या ॥
नवनीत पावले संपूर्ण वो ॥ ४ ॥ गव ॥
माथा ठेवउनि सिरसे अमृत गोरसे ॥
निघाली ते अनुभव नगरासि वो ॥
सा धावितसे गजर ॥
जिकडे पाहे तिकडे अवघे ब्रह्मरसें वों ॥
विकार खुंटला जियेचा ॥
बहुति चुकलि येरझारा वो ॥
सोहं प्रकाशे गवळणी ॥
गुरू स्मरणी तन्मय जालि वो ॥ ५ ॥ ॥ गव ॥

॥ श्रीः ॥

(॥ भानुसुत कृत ॥)

## ॥ चेंडु पद ॥

### ॥ श्रीगजानना ॥

राम रामा जय जया रामा ॥
पुराण पुरुषोत्तमा हो ॥
आत्मारामा मेघशामा ॥
सीता रामा परमाहो ॥ ध्रु ॥
श्रीनिधामा ॥
अति सुखधामा परंधामा पराहो ॥
नकळे महिमा अनंत लीला नेती श्रुतीहो ॥ २ ॥
दीननाथा स्वामी समर्था ॥

अनाथ रक्षक देवताहो ॥
चरणपंजी तारी मतिहीण ॥ देवा भानुसुताहो ॥ ३ ॥

॥ श्रीः ॥

(॥ ब्रह्मानंद कृत ॥)

## ॥ चेंडु पद ॥

झेलारे भाईनो झेलारे ॥
स्वानुभव चेंडु झेलारे ॥ ध्रु ॥
चेंडुसी लाउनी डोळारे ॥
समान बुध्दी खेळारे ॥ १ ॥

वरीचे वरी झेलारे ॥
तरी तोडायासी आलारे ॥
यमपोर नव्हे भलारे ॥
वोणवें करी त्यालारे ॥ २ ॥

खेळ हा मागील मोडारे ॥
पिंपळ तोडा तोडारे ॥
म्हातारिचें डोसकें फोडारें ॥
ब्रह्मानंदि पूर्ण बुडारे ॥ ३ ॥

॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥

॥ श्रीः ॥

## ( शेश कवी ॥ )

### ॥ श्लोक - चोळी बेतायाचा ॥

मणिगट तरी मुद्रे पञ्चगुणें धरावें ॥
षडगुण पिठकें ते उंचतेनें करावें ॥
परिमित कुशी संख्या हस्त लांबी धरावी ॥
परीध शेश कलेने कंचुकी बेतवावी ॥ १ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ माया·कृत ॥)

### ॥ जखडी ॥

रूम सुम जखडीगे दोही अंगे घाली ॥
सांडी सये लाज भज सद्गुरू माऊली ॥ १ ॥
लवधरी भावबलें संत संगें खेळें ॥
प्रेमांजन घालुनीयां मोडीवरी झोले ॥ २ ॥
उचलीला पाय पुढें ग्चीलाची ठेवी ॥
मणगटाची कला पूर्ण दाहीं ठांई दावी ॥
नाच निजगती छेद चुकोनको ताला ॥
अवसान चुकलीयां पुढें अवकळा ॥ ३ ॥
चिद्धना द्वैत घननीलग त्याचा पाया ॥
नभफुलापरी तरी उधो म्हणे माया ॥ ४ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्री: ॥

(॥ आनंदमूर्ती कृत ॥)

## ॥ टिपरी पद ॥

कलयुगी खेळियासि खेळीये जाणोनिया तो मेलारे ॥
त्रिविक्रमाते भेदुनि जिंकोनि तेही ॥
तिघेचि भिडति जालारे ॥
सहज देही असोनि नाही ॥
अंतरंगी खेळ खेळेरे ॥
तेणे सुखं सुखी होउनि ॥
अविनाश पद पावलेरे ॥ १ ॥

खोटा खेळ खेळोनि काये ॥
स्वतां स्वानुभव घेईरे ॥
अनुहातें नांदे टीपरी या घाई ॥
खेळे जाण तो भाईरे ॥ ध्रु ॥
मछेंद्रकुळी येक गोरक्ष जाला ॥
तो बहुत खेळ खेळलारे ॥
अष्टांग साधुनि पवन केलें ॥
त्याने बळे मातलारे ॥
खेचरी भूचरी चाचरी धरूनि ॥
अगोचरी निमालारे ॥
गोल्हाट साधुनि त्याने ॥
काळतो जिंकोनी टोलारे ॥ २ ॥

भुमीविण येक सरोवर आहे ॥
सांग ते कोटील कायरे ॥

तीरी तयाचे हौश नाचे ॥
तयासि नाहील पायेरे ॥
असे असे आणि सवेचि न दिसे ॥
अग्नींच भक्षुनि खायरे ॥
उतार याचा न कळे सर्व ॥
त्रिविक्रमाचे पायेरे ॥ ३ ॥

निवृतिचा पोर ये ज्ञाना जाणा ॥
तो खेळीया माजी शाणारे ॥
कवित्व केले त्याणे जि मातला ॥
प्रकृति गाळिली घाणारे ॥
असोनि मेले नसोनि आले ॥
काळ केला अकणारे ॥
बहुत काही देखोनि देही काय सांगावें कोण्हारे ॥ ४ ॥

जनार्दनाचि सात पांच पोरें ॥
त्यांत हा लाताड येकारे ॥
येकही साधन देही कर्तिो सहज मातला फुकारे ॥
परदेही तो काहीच नाणी ॥
रायासि म्हणतो रंकारे ॥ ५ ॥

पाचामध्ये येक वानर खेळे ॥
तयासि नाक ना डोळेरे ॥
हात ना पाये स्थीर न राहो जेथें तेथं तो खेळेरे ॥
जेव्हाचि जागे तेव्हाचि उगें ॥
निजोनि करी ते चाळरे ॥
यैसे वानर सांगसी नातरी ॥
तोंड करूनि जाये काळारे ॥ ६ ॥

नवलतेनें राखिले गाये ॥

तयासी तीनीच पायेरे ॥
धरूनी कामा एकेची अबा ॥
दुधे त्रिभुवन घ्यालरे ॥
जवळी आसे डोळा न दिसे ॥
मुखा वांचुनि ते खायेरे ॥ ७ ॥

तिघा जणाचे खेळणें जाल ॥
चौथे येक उदेलेरे ॥
यैसाचि खेळ खळोनि म्हणोनि ॥
गुरूसी शरण गेलेरे ॥
भवासी भ्याले कळले भले ॥
तीघांच समान जालेरे ॥
आपण जैसे पोरटे तैसे आनंदमूर्तिसी खेळेरे ॥ ८ ॥

येका वृक्षासी जाति ना कुळ ॥
खाले सेंडेवरी मूळरे ॥
तयाचें ढाळीं बैसली व्होळी ॥
तिणे जि मांडीला खेळेरे ॥
खेळोनि खळली ॥
जवळी मुळी खादी सहीत सकळहीरे ॥
झाड ते कैंचे सांगे कोणाचें ॥
भूमी नाही तेथे जळरे ॥ ९ ॥

गुरू चरण दृढ धरूनि चित्तीं ॥
सेवा करावि भांवेरे ॥
तेणे बळे काळ मर्दुनी पाई ॥
तयाच समान होवेरे ॥
येकदां खेळणें आनंद जिंतणे ॥
तरीच जन्मा येणेरे ॥

आनंदमूर्ति म्हणे जनातें ॥
यैसेच खेळोनि जाणेरे ॥ १० ॥

(॥ आनंदराम कृत ॥)

## ॥ दधि व्यापार ॥

ॐ नमो गणपति सारज वो ॥
मात नमीन हे गुरूचे चरण वो ॥
नमीन आदि नारायणे ॥
न रण डुळत बोहे वो ॥
आनंदि वो सदानंदि वो ॥ गव ॥ १

गवळणी सहजे समाधि ॥
बार सोळा धेनवा चरति लेपाभला ॥
सत्रावि येक ढवळि वो ॥
चारा चरे ब्रह्म सिखरी ॥
दुभे योगियाच्या धरी वो ॥ गव ॥ २ ॥

ब्रह्मज्ञान तापले वैराग्य निववीलेग गुरू बीजे ॥
विरजणे घातले वो ॥
सुमने सिक अवधारा ॥
मांजराचे भिणें लपविले वो ॥ सुमने सिक अवधारा ॥ गव ॥ ३ ॥

पाहा तिये पारा स्तापिले डेरा ॥
सुमने रवि भितरा वो ॥ गो ॥ ४ ॥

दरड भरियल्या निघाल्या मधुरी ॥
निघाल्या मधुरेच्या हाटा वो ॥
आनंदुन दुचमळा ॥ ५ ॥

सरल्या येरझा राहिल्या उभरा भरी ॥
तेथे अनंत लाभ जाला थोरी वो ॥
बोले सभे आनंद राम ॥ ॥ नगर ॥ ७ ॥ ७ ॥

## (॥ अनाम कवी ॥)

## ॥ दळणे ॥

तळी वरी तळी जांते मांडील बगुली वों ॥
कालमुखी वैरणे सकल मायादेवी दळी वों ॥
आदारापासुनी साई चक्र खुंटा तळी वों ॥
सहस्रदेल कुसरी ॥
चंद्र सूर्याच्या उजली वो ॥ दळ ॥ १ ॥

संकल्पाच्या सुपें उत्पत्ती संचित कण पाखडी वों ॥
निजकर्म पालणेंकी ये मानखदे काडी वों ॥
प्रालब्ध वैरणें ॥
सोहं खुंटा धरूनि वोढी वों ॥
समस्कारी वासना पुढती तेची पीट पाडी वों ॥ २ ॥

मनी हृदई वासनी सद्गुरे शरणांगत जननी वों ॥
दळील श्रम देखोनी धावें चिद्गन सांगतेंनीं वों ॥
दळणारी दळीयेली ॥
जांत सहित न दिसे नयनी वों ॥
निर्विकल्प उधवडे लावी स्वरूप होउनी वों ॥ ॥ ३ ॥ दळ ॥

॥ श्रीः ॥

(॥ दासविष्णु कृत ॥)

## ॥ दळण ॥

विवेकाचे जांते परमार्थ हा खुंटा ॥
वोढिति वरवंठा शुत्धबुत्धी ॥ १ ॥

शुत्धबुत्धी सये माझीया जवळी ॥
वोविया मंगळी गीती गाउं ॥ २ ॥

गीति गाउं सये सावडी दळण ॥
धातले वैरणें अहंकागचे ॥ ३ ॥

पहिलि माझी वोवी देवो लंबोदरा ॥
माझ्या विश्वंभरा पंढरीराया ॥ ४ ॥

दुसरीगे वोवी गाईन शारदाजा ॥
लक्षापती राजा द्वारकेचा ॥ ५ ॥

तीसरीगे वोवी माझ्या श्रीगुरूसि ॥
जेणे निजरूपासि दाखवीलें ॥ ६ ॥

माझा माय बाप पृथ्वीचा धणी ॥
छेत्तिसोकासनी ॥ पांडुरंगे ॥ ७ ॥

अष्टभावे भाई वाहाती सोकासन ॥
द्वारकेचे राणें पहुडले ॥ ८ ॥

विठोबाचे गाव भीवरेचे 'कांटी ॥
उभा वाळवंटी पंढरी राजा ॥ ९ ॥

माता रखुमाई जगत्र जननी ॥
प्रीति पान्हा स्थनि वोसंडत ॥ १० ॥

तूचि माझा माता तूचि माझा पिता ॥
तूचि सर्वांभूति सर्वा ठांई ॥ ११ ॥

तूचि माझी बहीण ॥
तूचि माझी सज्जन ॥
तूचि नारायण ॥
मागें पुढा ॥ १२ ॥

तूचि माझा बंधु तूच माझा भाई ॥
तूचि सर्वा देही ॥
साक्ष भूत ॥ १३ ॥

तुजपरता जीवलग आणि कोण आहे ॥
तूचि बाप मायें पंढरी राया माझ्या ॥ १४ ॥

पंढरीस जातां तुम्हि संत जन ॥
पांडुरंगा खुण सांगा माझी ॥ १५ ॥

देउहे लेहुनीकी सांगतां मुख वचनि ॥
म्हणाव चक्रपाणी धन्य तुझी ॥ १६ ॥

धन्य तूरे देवा निष्टूर झालासी ॥
आतां कळलासी पंढरीराया ॥ १७ ॥

भरवसा देउनि ॥ पाहासी परतोनी ॥
मज निरंजनि ॥ मोकळीले ॥ मोकळीले ॥

मज माझें कोण्ही नाहीं ॥
यैसीयासी काय करूं आतां ॥ १९ ॥

तरी त्या पांडुरंगा सांगारे येकांति ॥
बहु काकुलति येत होतों ॥ २० ॥

वाठुलि पाहतां सीणले नयन ॥
किति क्षणक्षणा उभि राहुं ॥ २१ ॥

उभी राहुनियां पाहातें तुज वासा ॥
वाटतें उदास देवराया ॥ २२ ॥
दास विष्णु म्हणे ॥ मज तुझाचि आधारू ॥
कठीण संसारू वाटे मज ॥ २३ ॥

॥ छ ॥     ॥ छ ॥     ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ बसवलिंग कृत ॥)

## ॥ दळण ॥

देह हे जांते फिरतेंगे साजणि ॥
नये हो यांत स्थिरता अझुनी ॥ छ ॥
अविद्या माया धुतली बरवी ॥
अहं हा खुंटा मुळीचा बसवी ॥
वरील खुंटा मनवे फिरवी ॥
आयुष्य धान्य दळन नुरवी ॥ १ ॥
संचित धान्य सर्वहि दळिला ॥
दलुनी शेखी मीपण झिजलं ॥
आशा लोभ वालिन चिकटील ॥
काळवो यासी बहु वेळा उकटीला ॥ २ ॥
याचीयां संग कष्टले बहु वेळा ॥
आलावो माय गुरूसी कळवळा ॥
हा जीव केळा जांतीया वेगला ॥
बसवलिंग तारिला अवलीला ॥ ३ ॥

॥ छ ॥     ॥ छ ॥     ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ अनाम कवी ॥)

## ॥ दिवाळी पद ॥

बारा दर्शेहि त्यांत येक बरवी दीपावळीचि बरी ॥
सुस्नातादिक होउनि सरसते भूषित भूषांबरी ॥
तैसी शामल सुंदरि प्रिय करी चातुर्य रत्नाकरी ॥
नाहि ई सम दुसरी तुम्ही पाहा तंजापुरिक पुरी ॥ १ ॥

॥ श्रीः ॥

(॥ अनाम कवी ॥)

## ॥ दिवाळी ॥

आजी दिवाळी दिवाळी आजी दिवाळी दिवाळी ॥ ध्रु ॥
हरी प्रियांची भेटी भाग्यें जीवपदी वोवांळी ॥ १ ॥
देश काळ नकळे हरी भजने कीर्तन भक्ती सुकाळी ॥ २ ॥
चिद्घन पूर्ण चिंदबरी वोळे उद्धव समोर न्याहाळी ॥
आजी दिवाळी दिवाळी ॥ ३ ॥ ॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥

॥ श्रीः ॥

(॥ केशव कृत ॥)

## ॥ नथ ॥

माझें नाकिचे बरवें मोतीगे ॥
वरि फांकती निर्मल ज्योतिगे ॥ १ ॥

बोध माणिक त्यावरि शोभतें ॥
उंचि पाहुनि खालुतें लोंबते ॥ २ ॥
शुद्ध सुवर्णी गुंतुनि स्वलीला ॥
मुखी मुखाचा दावी निज सोहळा ॥
अति सुंदर बहु ढालाचें ॥
नीच नवें परि बहु कालाचें ॥ ३ ॥
सर्व लेणें या मुखें लेणे वो ॥
गुरू वल्लभा मोहिले जेणें वो ॥ ४ ॥
गुरू कृपे केशव लेतसे ॥
मग सद्गुरू चुंबन देतसे ॥ ५ ॥

॥ श्रीः ॥

(॥ केशवसुत कृत ॥)

## ॥ नवल पद ॥

॥ पद ॥

नवल येक वितलें साजणी ॥
चंद्राविण चांदीणें अंगणी ॥
चंद्र ह्मणुनि पाहें जो गगनी ॥
गगन सहित गिळीला मेदिनी ॥ १ ॥
नवल नवल नवल वो बाई ये ॥
अनुभव सांगतां तो नये ॥ धृ ॥
नये मज सांगतां ते खूण ॥
खूण हेचि गुरू कृपे बाणें ॥
बाणलीयां भेदाभेद नेणें ॥

नेणेंतरि चैतन्य परिपूर्ण ॥ २ ॥

पूर्णमेचा तो नव्हे हो इंदु ॥
इंदुरूपतें जाहला आनंदु ॥
आनंदासी भेटे सच्चिदानंदु ॥
केशोसुत सांगे निजबोधु ॥ ३ ॥ ॥ छ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ पद ॥

गुरूदये नवल वर्तलें ॥
चंद्राविण चांदिणें पाहिलें ॥
दिसे नयनी बहु हो निर्मल ॥
कळंकेविण सुंदर सोज्वळ ॥ धृ ॥
जगी इंदु ह्मणावें तयासी ॥
क्षयो नाहिं कल्पांती वो तयासी ॥
निशिदिनी दिसलें दशदिशी ॥
प्रकाश त्याचा ना कळे मनासी ॥ १ ॥

न पाहतां झांकीलिया दृष्टी ॥
तेथेंही दिसे स्वरूप घनदाटी ॥
जेथें जावें तेथें लागे पाठी ॥
उजियेड लखलखी रवि कोटी ॥ २ ॥

सच्चिदानंद कृपेचेनि बळें ॥
पाहीन ह्मणे त्यासीच वो कळे ॥
केशवसुत बोलतो सखोल ॥
अनुभव्या येती प्रेम डोल ॥ ३ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ रामानंद कृत ॥)

## ॥ नवल पद ॥

श्रोतेहो परीयेसा येक नवल वर्तलें ॥
जनक जननीवीण येक बाळक देखीलें ॥
श्रीया वांचुनी तंव ते बाळक कन्या प्रसवलें ॥
अभीळासे करोनी तीन पाटीसी बैसवीलें ॥ १ ॥

विचारा विचारा यामाजी घालुनीया मन ॥
हा अर्थ कळलीयां चुकें जन्म मरण ॥ ध्रु ॥
तो बाळ ब्रह्मच्यारी ते पतीव्रता नारी ॥
विभीच्यार घडला तया दोघा माझारी ॥
तेथें येक जाहली ते हो डोळस सुंदरी ॥
डोळसीच्या पोटी झाली अंध कुमारी ॥ २ ॥

अंधकीच्या पोटी जाहाले तीघ कुमर ॥
त्या तीघा पासोनी अवघा जाहाला विस्तार ॥
त्या तीघाचा पणजा बहुत काळाचा थोर ॥
तयापदी रामानंद जाहला सुस्थिर ॥ ३ ॥

विचारा विचारा यामाजी घालुनीया मन ॥
हा अर्थ कळलीया चुके जन्म मरण ॥ ध्रु ॥

॥ श्रीः ॥

(॥ केशव कृत ॥)

## ॥ नांगर ॥

निज धैर्य नांगर धरूनी ॥
मोहो खुंटा सांडीला कंदुनी ॥ ध्रु ॥
ज्ञान भक्ती वैराग्ये ती फणी ॥
अती शुद्ध कळी हे मेदिनी ॥
श्रवणाचे चाडे हे धरीले ॥
गुरूवाक्य निज बीज पेरीले ॥ १ ॥

सद्वासनेचा वरूशला निज घन ॥
परिपूर्ण पिकले चैतन्य ॥
तेथे सत्व सोका राखण ॥
कर्मपक्षी हाकितो आपण ॥ २ ॥

चुचहुमेरा पिकले सेतवे ॥
स्वानंदाची घुमरी येत वो ॥
नंदाचि ससी हे होत वो ॥
गुरूकृपे केशवी घेत वो ॥ ३ ॥

॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥

॥ श्रीः ॥

(॥ देवदास कृत ॥)

## ॥ नांद्या ॥

॥ श्रीपूर्णानंद गुरवे नमः ॥

श्रीमहागणाधिपतये नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

गणेशा सारजा नमिली नमिली ॥
नमीली सद्गुरू माउली ॥
संतसज्जनें नमिलीं नमिली ॥
नांद्या खेळवी रंगी रंगीरे ॥ १ ॥

भाव नांद्या आला घरा घरारे ॥
भक्त पाचारी सामोरारे ॥
काहीं दान धर्म करा करारे ॥
ह्मणे खेळ पाहा बारा बारारे ॥ २ ॥

प्रवृत्ति निवृत्ति दोन्ही सींग सिंगहो ॥
शांति क्षमा दोन्ही चोर चोरहो ॥
सद्चिद् आनंदाचे रंग रंगहो ॥
नांद्या खेळवीन संगति संगहो ॥ ३ ॥

गर्जति अनुहाताचा घंटा घंटाहो ॥
वृत्ति सांखळया वरवंटा वरवंटाहो ॥
भाली गुरू देवाचा पटा पटाहो ॥
ह्मणे खेळ पाहा चौ हाटां चौ हाटांहो ॥ ४ ॥

नांद्या खेळवींन रंगी रंगीरे ॥
तरिच चित्त मन भोगी भोगीरे ॥

ऐसादुजा नाहीं जगींरे ॥
बैसोनिया साधू संगी संगीरे ॥ ५ ॥

ढोल वाजला वाजला वाजला ॥
जे गट नाद जाहला जाहला ॥ ६ ॥

नांद्या आतां पाचारिला ॥
खेळों लागला आंगावरि ॥ ७ ॥

नांद्या पुण्याचा पाय कोणता ॥
उचलुनि दावी तत्वता ॥
जो मान्य संता महंता ॥
तोचि दाखवीत असे ॥ ८ ॥

जो अविश्वासी अमंगलु ॥
केवल निंदक चांडालु ॥
पाहा पांदविली केवल ॥
डावें पाई खूण सांगे ॥ ९ ॥

संकल्प विकल्प दोंन्ही ॥
लेवविले होते जोडुनि ॥
च्यारी चरण झाडुनि ॥
शुद्धपणे आंगी खेळवी ॥ १० ॥

द्वितीय वाढ या पोटी ॥
सांटवल्या ब्रह्मांड कोटी ॥
तेथें नांद्या जग जेटी ॥
खेळो लागला स्वभावें ॥ ११ ॥

मारूं जाता नको म्हणे ॥
नरडी धरी दांतेविण ॥
दुखों नेदी आहाच पण ॥
जगा कौतुक दावितसे ॥ १२ ॥

नांद्या तुज ज्ञान दिधलें आहें ॥
हृदई वाचा दिधली पाहे ॥
ह्मणोनि हालवी डोइ ये ॥
मुकेपणे बोध सांगे ॥ १३ ॥

मुखी घालितां हात खोले ॥
आंतुन किणि किणि करी बोले ॥
सर्वांगासि देउनी डोले ॥
सभेसि प्रणिपात करीतसे ॥ १४ ॥

सांडा जीर्ण देहाची आस ॥
दात्ये होति ना कासाविस ॥
हेंचि दाते तुझी आस ॥
शब्द उदास करूनका ॥ १५ ॥

जें नवांठांई वितललें ॥
ते ह्याजी जीर्ण सोवलें ॥
दात्या हें तुज फावलें ॥
किर्ति घोष वानीन ॥
नांद्यालागि घेईन चारा ॥
याला पाऊन दे खरा ॥
मागतसें सज्ञान चतुरा ॥
वोलगीन खरा सभेपुढें ॥ १६ ॥

येथे जेणे आलस्य केला ॥
तो सर्वस्वा मुकला ॥
दान घेउन सामोरा आला ॥
तो उद्धरला सत्यवाणी ॥ १७ ॥

त्याचें दान मज साधन ॥
उदारपणे केले दान ॥

त्या दात्याचे लक्षण ॥
कीर्ति घोष वानीन ॥ १८ ॥

दान हरि हारी केदारी
दान शंभूचे शिखरी ॥
दान या माबळेश्वरी ॥
दान पावाल सर्वस्वें ॥ १९ ॥

दान पावेल मल्लिकार्जुना ॥
दान पावेल सोरटी भुवना ॥
दान विश्वनाथ नंदना ॥
जनार्दना दान पावेल ॥ २० ॥

दाता देखण्या उबगला ॥
नांद्या अलोलिक खेळला ॥
दोघांचा भवश्रम हरला ॥
एकां मिनला एकपणें ॥ २१ ॥

चैतन्य होऊनि उदार ॥
देवदासा मस्तकीं ठेविला कर ॥
गाहला नांद्याचा विस्तार ॥
संती साचार परिसिजे ॥ २२ ॥

॥ श्रीः ॥

## ॥ आनंदतनय कृत ॥

## ॥ नौका ॥

जो साधु जनकासी ॥
देख तया कामाच्या जनकासी ॥ हंसखीये ॥

कौंसाचा मारक जो ॥ हं ॥
सिंधूचा तारक जो ॥ हं ॥
तो गावा निसी व दीसी ॥ हं ॥
भोगावा बहु नवसी ॥ हं ॥
बैसुनिया तनु नावें ॥ हं ॥
हरीचे गुण गावें ॥ हं ॥
अतु विना जळज तु माहा ॥
खळसी तरी ती बळवंत नरासी ॥ १ ॥

आसेच्या घन सुसरी ॥ हं ॥
आकलुनिया न्हेती दुरी ॥ हं ॥
गर्व जळे उसळतसे ॥ हं ॥
गगनवरी तळपतसे ॥ हं ॥
मदळहरी नावरती ॥ हं ॥
चराचरी वावरती ॥ हं ॥
मी चतुरोत्तम मी परमाधम मी सुखी या दु:खी या जड मीपण ॥

मासा हा खळवळीतोर्घो वीषई ॥
घासा हा तळमळीतो ॥
ममतेची नागीणवो ॥ हं ॥
सरीतेची जोगीणवो ॥ हं ॥
उठ झडाडुनी सावध हो पथ नीठ विचारूनी कसि ॥
कसी जरी साट पीसाटपण धरिसी ॥
तरी लाटवळेंदुरी वावरसी ॥ ३ ॥

तरूण्याची गती अैका ॥ हं ॥
नरदेहो हे नौका ॥ हं ॥
जोडलीशे सुलभपण ॥ हं ॥
आदरीजे ते आपण ॥ हं ॥

पांचाच दळवाड ॥ हं ॥
संचुनीया पडीपाड ॥ हं ॥
रचल हो भव-तारू ॥ हं ॥
जड जीवाहे तास ॥ हं ॥
श्रीगुरू राज बांधुनी माज पाववी वोज चालवी भोज ॥ ४ ॥
नावाडीतो तारी ॥ हं ॥
पाववीतों परपारी ॥ हं ॥
दीनांचा कैवारी ॥ हं ॥
तो बाई भये वारी ॥ हं ॥
शंकचक्रधर वो ॥
दयानिधी रङ्क जनोद्धर वो परात्पर सङ्कटी सनातन वो ॥
रमापती पङ्कज लोचन वो ॥
तो हये मंदरोद्धर नंदनंद इंदु पुरंदर वृंदवृंदर सुंदर ॥
सोभन पावन सज्जन सुंदर भावन आनंद तनये विभू ॥ छ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ दिगंबरसुत कृत ॥)

## ॥ पांखरू ॥

वदना वांचूनी बोले ॥
पाठी चरण चाले ॥
हातींचें सुटोनी गेलें ॥
पांखीरूं माझें ॥ छ ॥
न दिसेवो नयनी ॥

पाहातां त्रिभुवनी ॥
चुंचुवें गगन ग्रांसुनि ॥ १ ॥

सखी पुसे सखीयेसी ॥
होईन मी तुझी दासी ॥
जरीं तुं आणुनि देसी ॥
पांखीरूं माझें ॥ २ ॥

निमिषें सागर शोषी ॥
उन्मेषें गगन ग्रासी ॥
मरण नाहीं वो तयासी ॥
पांखीरू माझें ॥ ३ ॥

येरी म्हणे अवधारीं ॥
दिगंबर सूत्रधारी ॥
पडलें तयाचें करीं ॥
पांखीरू माझें ॥ ४ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ देवदास कृत ॥)

## ॥ पिंगला बोलतो ॥

श्रीपूर्णानंद गुरवे नमः ॥ सावधान रायहो ॥ सावधान ॥

देवदास पिंगला ॥ सर्वा सार्वाहूनि निराला ॥
पांहों आलों लीला ॥ सुखाची सोहला पहावया ॥ १ ॥

अरे मी देवदास सर्वदा ॥ सांडूनियां द्वैत पणाची बाधा ॥
घालूनियां भेदो भेदा ॥ डौरनादा मी लुब्धलों ॥ २ ॥

14

माझ्या डौराचा हाले हात ॥ वैकुंठ कैलास डोलत ॥
वस्तूची हे वस्त ॥ माझ्या डौरांत बोलती ॥ ३ ॥

माझ्या डौराची वर्णितां परी ॥ शीणले वेद च्यारी ॥
श्रुति ठकावल्या यापरी ॥ महिमा निर्धारी नेणवेचि ॥ ४ ॥

शेष ह्मणती तोंडाळ ॥ डौर वर्णावया करी वलवल ॥
मग आडलली ढिसाल ॥ दडूनियां राहिला ॥ ५ ॥

माझ्या जोतिषा साठी ॥ चंद्र सूर्य लागती पाठी ॥
देव तेहतीस कोटी ॥ जोतिषा साटी जवळी येती ॥ ६ ॥

माझें जोतिष चरा चरीं ॥ एकवीस स्वर्गाद्वनिवरी ॥
सप्त पाताला भीतरी ॥ माझे जोतिष दणांणी ॥ ७ ॥

माझ्या जोतिषाचा भाव ॥ पाहावया समस्त नव्हे अरिराव ॥
मनी धरूनिया भाव ॥ सावधान परिसिजे ॥ ८ ॥

माझे जोतिष होतें गुरूच्या पायीं ॥ होते तें पडिलें ठांई ॥
मग देंहीच होउनि विदेही ॥ आनंद डोंही बुडालों ॥ ९ ॥

संत म्हणती देवदासां ॥ राहिली पुसावयाची आशा ॥
वेदांत सिद्धांतिच्या ज्योतिषा ॥ प्रकट करूनि सांगावें ॥ १० ॥

वेदांत सिद्धांत प्रमाण ॥ तँ मी सांगेन संपूर्ण ॥
सद्गुरू कृपालु चैतन्य ॥ वदविलें आपण स्वयंचि ॥ ११ ॥

आतां सांगीन बारा रासी ॥ ज्या उत्तम जन्म कालासि ॥
नामारूपा वेगळा होसी ॥ रासी जे तिथ्या तेथें संचरल्या ॥ १२ ॥

आंता सांगेन वडिलांची कुलकोटि ॥
संतां पुसतसें गोमटी ॥
कृपा करूनि उठाउठी ॥ नामासाटीं भुकेलों ॥ १३ ॥

वडिले वडिचा निर्विकार ॥ ब्रह्मा विष्णुपुत्र रूद्र ॥
धरिची महा माया सुंदर ॥ जग डवाल चालविती ॥ १४ ॥

तिचा सांगतां विस्तार ॥ ऐसा आहे घरिचा विचार ॥
संत संगती साचार ॥ ऐक देवदास ॥ १५ ॥
तेथून मोटें आहे गुज एक ॥ थोर थोर देखाल कौतुक ॥
जेणें सर्व जनासि होय सुख ॥ तिचे कौतुक आइका ॥ १६ ॥
मागें विघ्न जाले थोर ॥ होता अविद्येचा आधार ॥
तो निरसला साचार ॥ या सद्गुरुनाथें ॥ १७ ॥
काम क्रोध लोभ वैरी ॥ करित होते भरोभरी ॥
बोधें त्यासि केली बोहरी ॥ गांवां बाहेरी घातली ॥ १८ ॥
वाईटावरी होती सेजारीणि ॥ कामना कल्पना ठाणें करीणी ॥
त्यासद्गुरु निर्दालुनि ॥ कंटका पासूनि सोडविला ॥ १९ ॥
सद्गुरु भेटला मंत्रवादी ॥ न चले अविद्येची उपाधी ॥
भावना आणिली सोहं बुद्धी ॥ क्षणे भवाब्धी तारिला ॥ २० ॥
अतां पाहा एक शकुन ॥ जेणे चित्तास होय समाधान ॥
इछित नाहीं तुमचे धन ॥ कृपापूर्ण असोंद्यावी ॥ २१ ॥
मी पुर्वीहोनि तुमच्या पोसणा ॥ काय मागावें या शकुणा ॥
तुमचे कृपेने कळते जाणां ॥ तैशा खुणा जाणतों ॥ २२ ॥
शकुनवंती चित्र विचित्र ॥ येवढें घडे चराचर ॥
त्यामधें सारासार ॥ तेचि साचार निघतसे ॥ २३ ॥
संत पाहतां शकुनवंति ॥ अपूर्व दिसे भागीरथि ॥
वने उपवने शोभती ॥ पुष्पमालामंडित ॥ २४ ॥
गाई गोधनाच्या थाटी ॥ रंगमाळा दिसे गोमटी ॥
दीनानाथा जगजेटी ॥ भेटी होईल सत्य वचन ॥ २५ ॥
देवदास विनवी साधू संता ॥ आईका उत्तम रसाळ कथा ॥
चैतन्य गुरु वदविता ॥ तेणें हे कथा वदविली ॥ २६ ॥

श्रीपूर्णानंदार्पणमस्तु ॥ श्रीशंकरार्पणमस्तु ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ श्रीरङ्गराजजोशी कृत ॥)

## ॥ पिंगळा ॥

सुखाचें जे सुखरूप ॥
ते म्हणे आखंड आहे अमूप ॥
ते म्हणे पाहों जातां अनेक ॥
ते म्हणे अनेकाचें होईल येक ॥ १ ॥
म्हणउनि पिंगळा सांगतों होईक मा ॥
तेथें निर्माण होईल बाईकोमां ॥
ते म्हणे जगचि व्यापुनि राहीलमा ॥
तीस येक कन्या होईलमां ॥ २ ॥
ते म्हणे पुरुषाविण भोगीलमा ॥
तीस होतील तिघें बाळमा ॥
तिघां बाळांचे तिनि खेळ ॥
येक मोडील येक मांडील ॥ ३ ॥
येक मांडील येक मोडीलमा ॥
अैसिं अनंत युगें जातीलमा ॥
हे लटिकें विधिनपरि थोरमा ॥
आलें खाल्या घरिंमां ॥ ४ ॥
तुम्हीं सेटे माहां जन थोर थोरगा ॥
तुम्ही म्हणे सावध होउनि अैकागा ॥
श्रीरङ्गराज जोशीगा ॥
हें ह्मणे होईक त्यासि पुसागा ॥
हें म्हणें कोणतें खरें सांगेलगा ॥
त्याचा दास होउनि राहीनगा ॥ ५ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ अनाम कवी ॥)

## ॥ पिंगा ॥

खेळ बुधी बाईगे ॥
पाहासील काईगे ॥
चित्र ठेवि ठाईगे ॥
भवानिच्या पाईं ॥ ध्रु ॥
ज्ञान गंगा तीरी ॥
घालि पिंगा स्थीरी ॥ १ ॥
आहे निश्चळ ध्याया ॥
लागो तीच्या पाया ॥ २ ॥
आनंदी मुक्त जाल्या ॥
हंसी मिळुनि गेल्या ॥ ३ ॥
नाना वर्ण शक्ती ॥
फिरली त्याच्या वृत्ति ॥ ४ ॥
सख्या च्यारी भक्ती ॥
मुळीच्या खुणा जाणती ॥ ५ ॥
अवघ्या घालुंपिंगा ॥
धरूनका संसार संगा ॥ ६ ॥
निवांत सुखे राहा ॥
येकांत करूनि पाहा ॥ ७ ॥
माजि कर ठेउनि ॥
प्रेमानंदें डोलुनि ॥ ८ ॥
सुधा घालि पिंगा ॥
सांडी प्रपंच रंगा ॥ ९ ॥

आता स्थीर सजणी ॥
राहे अधीष्ठानि ॥ १० ॥

भवानि शंकर पुजा ॥
भावे त्यासि भजा ॥ ११ ॥

सागरांत गंगा तैस ॥
पूर्ण बिबी पींगा ॥ १२ ॥

आलावो आलावो हरी हा आलावो ॥
आईकोनि आनंद जाला गोपिकालावो ॥ १३ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ गोपाल रघुनाथ कृत ॥)

## ॥ पिंगा ॥

सोडि विषय झिंगा नीट घाली पिंगा ॥
माया मतें खेळसी डाव येईल आंगा ॥ धृ ॥
सोय धरीं काहीं ॥ आतां फिरोनीयां पाहीं ॥
डगमगों नको स्थिर ॥ सस्वरूपीं राहीं ॥ १ ॥

कटिं हात ठेवीं माथा ॥ फिरू देवो बरा ॥
स्वानुभवें घुमुसंत संग धरूं खरा ॥ २ ॥

पती पुत्र माय बाप प्रपंचीक येथे ॥
जीवा यम गांठी कोण सोडवील तेथें ॥ ३ ॥

संसाराची सोयबाई जाण अवघी फोस ॥
नासिवंत सर्व याची काय धरीसी आस ॥ ४ ॥

जैसें सावे तैसे जावें ॥ काहीं नये सवें ॥
गोपाल रघुनाथ शरण जाये ॥
जीवें जाला ॥

॥ श्रीः ॥

(॥ केशव कृत ॥)

## ॥ प्रेमदोरी ॥

प्रेमाची दोरी पडली तुझ्या पाई ॥
नचले आतां कांहिं ॥ पांडुरंगा ॥ १ ॥
आनंत ब्रह्मांड तुझी या उदरी ॥
ह्यदया माझारी ॥ तों तु माझ्या ॥
आतां जेथ तेथ जाईन मी देवा ॥
तेथही केशवा ॥ येण तुज ॥ २ ॥
तु तव निर्दोष घडला माझा संग ॥
विचारी अव्यंग ॥ ह्मणोनीया ॥ ३ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ केशवराज कृत ॥)

## ॥ फुगडी ॥

उघडी होउनि फुगडी घाली लक्ष निर्धारा ॥
भावे साचा हात धरूनी जाई मुळिच्या घरा ॥ १ ॥

फुगडी फुगे येक तुझी तुगें ॥
हागुन भरलेंघृतुझ्या तोंडावरी थुगे ॥ ध्रु ॥
इतकी भोय सारीं सेण सुपली वारी ॥
आत्मयोगें साधुसंगे बैसें निराकारी ॥ २ ॥

तुज मज बार तेथें खुंटला वीचार ॥
अंतर कळा हाता आल्यां कैंचा संसार ॥ ३ ॥

मी मी ऐसें तुच्छ हेच तु पाहे पोरी ॥
मीपणाचा शोध घेतां तुंपणा नाहि उरी ॥ ४ ॥

फुकट विषय खोडि सांडि जग झोडी ॥
सद्गुरुकृपे केशवराजिं घेईल अखंड गोडि ॥ ५ ॥

॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥

॥ श्रीः ॥

(॥ शिवराम कृत ॥)

## ॥ फुगडी ॥

फुगडी फुगे फिरूनि पाहे तुगें ॥
अंतरंगी रंगे साधूचे निसंगें ॥ ध्रु ॥
रामपदें जोडुनियां धरी माझा हात ॥
माघपुढें पाहुनको होय सावचीत ॥
भ्रम भोवडीचा वारा झणी घेशी येत ॥
अैसे जरी चुकसी तरी होवं पाहे घात ॥ १ ॥

बोलण्याचा राग बाळे धरूनको जीवी ॥
सांगते मी ते तुला पाहे अनुभवीं ॥

झणी गुंतसीवो या सौंसयाच्याची ॥
अनुदिनी लक्ष धनी हाचि पक्षे सेवी ॥ २ ॥
पूर्णानंद प्रभु पदीं राहे ठायींचे ठाईं ॥
परे पर्ता वर्ता तुझा भरतार पाही ॥
आतांतरी लाज धरी पदर शिरीं घेईं ॥
अैसी फुगडी मामा घालां शिवरामा पांई ॥ ३ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ अनाम कवी ॥) (॥ चिद्धन ॥)

## ॥ फुगडी ॥

घाली रंगी पींगा ॥ सांडी धागड धींगा ॥ ध्रु ॥
माथ्याचा पदर उरी अवरूनी खोवी ॥
हात हालोनेदी निजकटावरी ठेवी ॥ १ ॥
मोडी माज सोडी लाज भज गुरूच्या पांई ॥
दोहीपरी लव धरी लावी भाल भोईं ॥ २ ॥
भाग सीण हरे गुरू चिद्धन ध्यातां ॥
संत सभे नित्ये उधवासीपीलंगतां ॥ ३ ॥

॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥ ॥ ध्रु ॥

॥ श्रीः ॥

## (॥ चिद्धन ॥)

## ॥ फुगडी ॥

फुगडीगे तुजी गडीगे ॥ उघघी खेळता काल रंगडीगे ॥ ध्रु ॥
झाकी बरे अंग जगां लावी नीज वेधी ॥ सांडुनीयां आस कास ॥
घाली सम बुत्धी ॥ १ ॥ सांडी विषय वोढी संत सभे हात जोडी ॥
प्रेमभरें नाच भाववळें हात जोडी ॥ २ ॥

चिद्घनौद्धत सभेंभुती सम बाई ॥
पाहतांची उद्धवासी नास कधी नाहीं ॥ ३ ॥
॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ लीलाविश्वंभर कृत ॥)

## ॥ फुगडी ॥

फुगडी फुगे मागें पुढें तुगें ॥
चीदानंदीं रंगेगे साधुच्या निसंगे ॥
देहमदे फुगेगे भाग्यमदें फुगे ॥
गर्वमदे फुगे त्याच्या तोंडावरी थुगें ॥ छ ॥
आपुली मांडी उघडीतां आपणासी लाजगे ॥
अंतरीची ज्ञानकळा झांकणें हे वोज ॥
वादविवाद सांडी जाणीवेचा माजगे ॥
फुगडी घालीता दिठी दाखवीन चोज ॥ १ ॥
नींदयेची वाहण बाई धरूनको तोंडीगे ॥
आत्म साधनी बाई खवाउंनको रोडीगे ॥
काम क्रोध लोभ याचा समागम सांडीगे ॥
हरीनामी हरीरंगी घालीं फुगडीगे ॥ २ ॥
मजतुज बारगे कासयाचा बाई ॥
लटिकेसा चार हे तंव मानु नको कांहींगे ॥
येका भजे भांवि बाई सद्‌गुरूच्या पायींगे ॥
लीला विश्वंभरा गुरूस्वामी सदा गायींगे ॥ ३ ॥
फुगडी फुगें ॥ २ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ अनाम कवी ॥)

## ॥ बुद्धीबळ ॥

जैसें बुद्धीबळाचीये पोटी ॥
पूर्वे संस्कार नसतां गांठीं ॥
राजा पशु प्यादा उठीं ॥
निर्धारिता दिष्टि काष्ट येक ॥ १ ॥

येकचि काष्ट दोही भारीं ॥
तेथें कोण कोणाचा वैरी ॥
वैर नसतांरे निर्धारी ॥
मारामारी अचेतना ॥ २ ॥

म्हणति हस्ति घोडा प्रधान मेला ॥
तेथें काये त्यांचा जीव गेला ॥
प्यादा होता तो प्रधान केला ॥
तो काय पावला गजांत लक्ष्मी ॥ ३ ॥

येवं बुद्धीबळाचे परी ॥
ज्याचि दीष्टि निज सौंसारी ॥
तोचि अवताराचा अवतारी ॥
जाण निर्धारी उद्धवा ॥ ४ ॥

॥ छ ॥          ॥ छ ॥          ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ दासकल्याण कृत ॥)

## ॥ भोजनश्लोक ॥

सुखे वाढिती ते मुख्य संतसाधु ॥
असंभाव्य तो जाण बोधु आगाधु ॥
रूचि भोजेनाची मीटी प्राप्त जाली ॥
भले जेंवीले वृत्ति त्यांचे निवाली ॥ १ ॥

कितीयेक ते स्वाद नानाप्रकारे ॥
माहा योग्यो ते जेवीती श्रोत्र द्वारे ॥
मनामाजी संतोष त्या भोजनाचा ॥
गळाल्या महा मोन चत्वारी वाचा ॥ २ ॥

कितीयेक ते सारीली सुळभक्ष ॥
बहुतापरीची सलक्ष विलक्षे ॥
बरा वेळीला भात त्या सूक्ष्माचा ॥
सुवासेच भावीतसे साधनाचा ॥ ३ ॥

बहुता वृताच्या किती येक शाखा ॥
वरान्ने क्षीरी वाढील्यां कामनेच्या ॥
कितीयेक तीर्थाकळी राईताच्या ॥ ४ ॥

रूचीची कथी सद्योदनाते ॥
सुवासे जळे निर्मळे घेती शीते ॥
बहु भोजने पाळटे सर्व काया ॥
म्हणे दास कल्याण हो रामराया ॥ ५ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ केशव कृत ॥)

## ॥ भोजन ॥

संत समागम सिकलो जेउ ॥
आहं सहित नाठवे सोहं ॥ छ ॥
विवेक वर्ण निवृती रोटी ॥
स्वानुभव घृतं वाढिले ताटि ॥ १ ॥
शांति हे क्षीर वाढिली वरी ॥
सप्रेम साखर साजिरी वरी ॥ २ ॥
विश्रांती घारी अभेद मांडे ॥
मोक्ष निजांमृत त्यावरी सांडे ॥ ३ ॥
आलक्ष वडा बहुत फुडा ॥
समाधी फेणीचा स्वादतो गाढा ॥ ४ ॥
वैराग्ये पापड भजन भाजी ॥
निष्काम लोंणच सेविले आजी ॥ ५ ॥
स्वबोध भातस्वानंद कढि ॥
जेविता तव तव गोडि ॥ ६ ॥
प्राप्त दध्योन वाढले ठांई ॥
सबाह्यें तृप्त जेविता पाही ॥ ७ ॥
गुरुकृपे केशव जेउनिधाला ॥
ढेकर देउनि ईश्वर जाला ॥ ८ ॥

॥ छ ॥   ॥ छ ॥   ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ केशव कृत ॥)

## ॥ रंगारी पद ॥

आम्ही रंगारे रंगारे ॥
राम नामी रंगलो बारे ॥
रंग जड मूढासी लाउं ॥
राजा नाम नयेनी पाउं ॥
राम नामी रंगा आले ॥
अम्ही रंगारे पै आहालो ॥
केशव म्हणे मी रंगारा रंगवील जन सारा ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ अनाम कवी ॥)

## ॥ राहाट ॥

॥ धृ ॥ माझे राहाटगे साजणी ॥ कां तु दोघी जणी ॥
पिजित्त होतेगे आंगणि ॥ पाहाळ गेलेगे बा-यानि
माझे राहाटेंगे साजणी ॥ छ ॥
माझे राहाटाच ते डोक ॥ माझे राहाट आकरा भोक ॥
कोण सुताराच लेक ॥ राहाट केलेगे ॥
साजणी कां तु दोघी जणी ॥ १ ॥
माझे राहाटाच ते खोडुके ॥ माझे दादुले बोडुके ॥
घेतले निनि हात फडके ॥ उडाले नदिच्या थडिकें ॥

बेडुकान वोडलस डोके ॥ फुटले वरनाच मडक ॥
माजे राहाटगे साजणी ॥ २ ॥

माझे राहाटाचे ते कणा ॥
मी काति तसे झण झणा ॥
सकाळी उठोनि सेता जातां ॥ तुम्ही नांगर घेउनि ॥
हा कारना ॥ तुम्हीं खुडुनि चणे खांनां ॥
दादुला तुजला घेइन दोनी वाहाणा ॥
माझे राहटगे साजणी ॥ ३ ॥

माझे राहाटाच ते ईड ॥ मि का ती तसे इडे पाडे ॥
दादुला तुजला घेइन घोडे ॥ आपल्यास करीनं सरीता नवड ॥
माझे राहाटगे साजणी ॥ ४ ॥

माझे राहटेचे ते बुद्धि ॥
गहू घेतलि बाळये घाटी ॥ म्या खादले तुपरोटी ॥
दादुला तुज सव सांगन गोष्टी ॥ तुझ्या गळा घालिन मीटी ॥
माझे राहटगे साजणी ॥ ५ ॥

माझे राहटाचते दांडि ॥ माझे धर वेसिच्या तोंडी ॥
माझे दादुले ते लंडि ॥
त्याचे दुगी नाहि चिंदि ॥ माझे राहटगे साजणी ॥ ६ ॥

माझे राहटाच ते पेलु ॥
मी कराति तस हळहळु ॥ माझे दादुले कुंतलु ॥
माझे राहटगे साजणी ॥ ७ ॥

माझ राहाटाच ते माळ ॥
माझे कडिये ताने बाळ ॥
माझे पोते हे ते ढळ ॥ त्याचे डोई पींपळवानगे
माझे राहाटे साजणी ॥ ८ ॥

माझे राहाटाच तेवेंटण ॥ माझे माहेर मुगी पैंटण ॥
त्या खाले वरले गोंटण ॥ माझे राहटगे साजणी ॥
का तुं दोघी जणी ॥ माझे राहाटगे साजणी ॥ ९ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ देवदास कृत ॥)

## ॥ बावडी ॥

॥ पद ॥

याचें गुरूमुखें करा विवरण ॥
हे नीर्वाण दसेचि खुणें ॥ छ ॥
जेथें बावडीन वारे उडे ॥
जेथें सागर थींझरी बुडे ॥
ससा हातिसीं हें सांपडे ॥
हे न म्हणावें बापानो कोडरे ॥ १ ॥
व्याघ्र गिलुनी बैसली गाये ॥
बाळ खाउनी माउलि धाये ॥
नदि गिलुनी मछ हा राये ॥
मुंगी गिळोनी गगना जाये ॥ २ ॥
चंद्र चकोराने ग्रासीला ॥
मेघ चातकें कोरडा केला ॥

खद्योतें ग्रासिलें सूर्याला ॥
खुण बाणली देवदासालाग बाई ॥ ३ ॥
॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ अनामकवी ॥)

## ॥ विंचू ॥

विंचु उतरागे साजणी ॥ आणा सारङ्गपाणी ॥
वैर साधीलें ॥ तयान चित्त नेले चोरूणी ॥
उभी होते मी अंगणी ॥ हारुशे माझे मणी ॥
सोळा सीनंगार करूणी ॥ पीतांबर कासोणि ॥
रंगीत कांचोळी सुख वेळी ॥
उभी चित्र साळी ॥ खांब कवळीळा आवचीता ॥
तेथ विंचु होता ॥ १ ॥

॥ श्लोक ॥

श्रींघार केले बहुतां उल्हासें ॥
तो शेत्रु वाटे मन होये पीसें ॥
माझ्या जिवाची गती सर्व जाणा ॥
जा जा सखयानो बननीळ आणा ॥ १ ॥

विंचु नव्हेग हा का ॥
मन माझे व्याकुळु ॥
सुटल्या वीर गांठी ॥
मोकळ्या भूमीसी लळ्या ॥

सीतळ लावागे चंदना ॥ जलावीन जैस मीना ॥
भेटवा मदनाचा पुतळा ॥ मोहिल्या जीवनकळा ॥ २ ॥

॥ श्लोक ॥

लाउनका चंदन या शेरीरा ॥
तोही सख्यानो करीतो उभारा ॥
वारा न साहे घडी सोसवेना ॥
जा जा सख्यानो घननीळ आणा ॥ १ ॥
विंचु करीत समज कसी ॥
कळ लागली मनगटी ॥
सीतळ लावाग चंदना ॥
मैलागीरी मर्दना ॥
माळा सर्वांगी सुमना ॥
पोळती तीक्ष्णा ॥
काहाडा वेगी भूषण ॥
जीव हा बहुत क्षीण ॥
भेटवा मदनाचा पुतळा ॥
मोहिल्या जीवन कळा ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

छयाया मला जाळीत यावनासी ॥
सीतळ करी सखी कोन वेसी ॥
माझ्या जिवाची गती सर्व जाना ॥
जा जा सख्यानो घननीळ आणा ॥ ४ ॥
धावा धावाग झडकरी ॥
बहुत पीडा करी ॥

तिडका उटल्या ॥
लल्याटी जीव जात सही पुटी ॥
मन हे फिरतस दाही दिशा ॥
चंद्र चकोर जैसा ॥
भेटवा मदनाचा पुतळा ॥
मोहिल्या जीवन कळा ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥

वसंतकाळी निसी मध्ये भागी ॥
गोपीस राधा म्हणे जाये वेगी ॥ ६ ॥
माझ्या जिवाची गती सर्व जाणा ॥
जा जा सख्यानो घननीळ आणा ॥ ७ ॥
हरी हा भक्तांचा कैवारी ॥
आला शेजवरी ॥
विंचु उतरीला ॥
ते वेळी सुखी झाली वेल्हाळी ॥
भोग प्रीतीचा घेउनी आलींगन देउनी ॥
विप्र राहीला श्रीचरणी ॥
भाव भक्ती करूणी ॥
विंचु उतरीला ॥ ८ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ केशवराज कृत ॥)

## ॥ विटी दांडु ॥

यारे खेळों भाई टोले गुजारी भुली द्रिस्टी घालुनी
ईटी गुजारू निर्धारी ॥ ध्रु ॥

अनुभवदांडु घेउनी हाती गुंजारिली ईठी ॥
उडाली गगनापरी ते मुळीहुनी नुठी ॥ १ ॥
परतोनी निज दांडु न्याहाळीला भाई ॥
लक्षी लक्षभीनता ईटी आदळी ठाई ॥ २ ॥
सद्‌गुरू कृपे केशवराजी स्वरूप साक्षात करी ॥
रामराज्य जाले आतां दोरा नलगे सारी ॥ ३ ॥

॥ श्रीः ॥

(॥ अनाम कवी ॥)

## ॥ विनोद ॥

कोण्हा येकया कवीनें विधीस वीनवीलेंचुकलासी सुदक्षा ॥
मुर्खाला दोनी श्रींगें तदुपरी दुसरें सजना दोनी पक्षा ॥
यैसें दोन्ही घडाया बहुत विधीवरा चुकलासी भ्रमानें ॥
तो ब्रम्हा बोलीलाकी विधीस न चुकलें प्रारब्द यैकें कर्मानें ॥ १ ॥
मुर्खाचें वचन मुलीचें खोचे सेराचे रीती ॥
देता श्रींग तयासी मारलि जना काही न चाले गती ॥
ज्ञात्याला जरी पक्षे देउं तरीकीं उध्धार नोव्हे जना ॥
चींता येईल तेथ जाईल असी केली नसे भावना ॥

॥ श्रीः ॥

(॥ नारा कृत ॥)

## ॥ व्यापार ॥

॥ पद ॥

पुंडलीक पेट केली ॥
संत ग्राहीक मीळाली ॥ ध्रु ॥

प्रेम साखरा जोखती ॥
नघे त्याचे तोंडी माती ॥ १ ॥

नाम द्राक्षाचेपैं घडें॥
रसालवीकी आले गोडें ॥
पुंडलीक पेट केली ॥ २ ॥

समतेचे फनस गरें ॥
आंबे पीले पडीपाडें ॥ ३ ॥ पुंडली ॥
सद्‌गुरू वंचणें तुपकेळें ॥
बरवी कालवीले मेळ ॥
पुंडलीक पेट केली ॥ ४ ॥

नारा म्हणे धरा भावें ॥
आभक्ताचे मड जावों ॥
पुंडलीक पेट केली ॥ ५ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ गोविंद जोशी कृत ॥)

## ॥ सासु सुनाचें भांडण ॥

वंदीन आतां गणनाथ भारीं ॥
दुर्वा फुलें मंडीत कारभारी ॥
शोभा जया सुंदर सेन्दुरान
वाहनहीं राजस उंदिरानें ॥ १ ॥

सासु सुना वादति त्या सुखानें ॥
ऐका आतां सावध हे सुकानें ॥

झाला आतां हा युगधर्म ऐसा ॥
सोसेल कां बा कवणास कैसा ॥ २ ॥

॥ पद ॥

सासुसिं भांडुनि सुनवो कसि दीनवो ॥
मायबापां सांगते पुरे पुरे घरचार आजिहा ॥
मनामाजिहा ॥
विष घेईन आतां ॥
मुख मी न दाखवीं मागुतां जनि वागतां ॥ ३ ॥ धृपद ॥
खाज्या करंज्या गुळव-या आणी तेलव-या ॥
केले गुंजाचे लाडु ॥
अरुवार सारवरे घोळिले तुपें तळीले ॥
जिरें साळीचा भात ॥
सासुसि भांडुन सुनवो ० ॥ ४ ॥
केल्या साखर फेणिया ॥
अंन फेणिया ॥
बेरें कढविलें लोणी दूधहिं भरूनि आटिलें ॥
हळु घोटिलें ॥
ऐसे करिति सये सासुसिं भांडुनि सुनवो० ॥ ५ ॥
चरवीचें आधन ठेउनि ॥
दूध घालुनि ॥
केली बोटव्यांचि खीर ॥
वरि वरी साखर घालितें ॥
अणि घोटिते ॥
तुक मणाचें सख्ये ॥
सासुसिं भांडुन० ॥ ६ ॥

डांगर पोळिया फणसें ॥
आणि कणसें ॥
तीणें अणउनि ऐसें ॥
छेदें श्रमविलीं माणसें ॥
झालिं काणसें ॥
केले अपूर्व मेवे ॥
सासुसीं भांडुनि सु० ॥ ७ ॥

खारिक खोबरे आणिलें ॥
वरि किसिलें ॥
वरी खसकस पसां ॥
साखर घालुनि मळिते ॥
तुपं तळिते ॥ केले अरूवार लाडु ॥
सासुसिं भांडुन सुन वो० ॥ ८ ॥

पापड तिळवड्या कुरवड्या ॥
वाढी परवड्या केलें सेवायां लाडु ॥
काढुनि वडि घडि झेलित ॥
गरजेलिते केलिं पक्कानें तीन सासुसीं भांडुन ॥ ९ ॥

आणिलि वालुकें कोवळिं घन कोहळी ॥
सोन केळांचे घड ॥
अंबे अणविलि खर्बुजें ॥
आणि तर्बुजें ॥
ऐसी अगणित फळें ॥
सासुसिं भांडुन सुनवो० ॥ १० ॥

प्रकार अवघेहिं काढुनि ॥
ताटिं वाढुनि दृढ बैसोनि पाटिं ॥

घन घन कंबळ मळितें ॥
मग गिळिते ॥
डोळे झांकुन बाळा ॥
सासुसी भांडुन ॥ ११ ॥

सासुसि भांडुनये खुणे ॥
रूसे आपण भोळि सासु हें नेणे ॥
घाबिरि होउनि मनवीते ॥
जना विनवीते ॥
विष काशाला घेते ॥
मजसिं भांडुन सुन वो ॥
कसि दीन वो ॥ १२ ॥

माया नसंडी आजिवो ॥
पाहे मजवो ॥
तुझें अभीष्ट करी ॥
तेथें मी वटवट न करी उठी झडकरी ॥
वर वर चार तुझा मजसिं भांडसि कां सया ॥
व्यर्थ कासया ॥ १३ ॥

कलियुगी कामिनी महिमा बहु कृत्रिमा ॥
कोण जाणेल सीमा ॥
मानिनी विश्वास न करीं ॥
धीर हा धरीं ॥
सांगे गोविंद जोसि ॥
सासुसीं भांडुन सुन वो ॥ १४ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

(॥ नामा कृत ॥)

## ॥ सासुरवास ॥

## ॥ सासु सुनाचे भांडण ॥

विख मीं घेईनगे बाई विखहें दारूणगे ॥
दारूण विख काय करूं हा संवसार खोटा ॥
काहिं करितां मज काहिंच होईल दादुला होईल पोरटा ॥
माझ्या घराच्या तीनवाटागे बाई ॥ ध्रु ॥

सासु सुना दोघी भांडण भांडती विपरीत बोल बोलती ॥
सेजारिणी बाई सांगों मिं काई जन्म नाहिं मागुता ॥
दादुल्याच्या गुणें सोसिलें म्या उणें तोंड दाउं काये आतां ॥
घेईन विख देईन प्राण आंगीं लागो जिणियालागे बाई ॥ १ ॥

बारिक तांदूळ मोकळे वेळीले लवंगाच्या परिमळें ॥
सोनसळे गहुं सडुनि साजणि दुधाचे आधण केलें ॥
घृत शर्करा त्यामध्यें घातलें नीपटचि कडुजालें ॥
आणुशे पोटिं तें म्यां घेतलें काळिजीं झोंबियेलेंगें बाई ॥ २ ॥

पाहाटे दादुला दीवाणांत गेला मीं वोउविलें झडकरी ॥
झाडि फेडि केली घरामध्येगे ताट केलें झडकरी ॥
उनुन दुध सजुक कण्या घेतल्या वाड्या च्यारी ॥
तेणें मज जे मूर्छना आलि पडिलें होतें घड्या च्यारीगे बाई ॥ ३ ॥

बारीक मांडे लाडु तीळवे लोणियाचे सुखेंर ॥
वडे पापड ठेउनि कडेमध्यें बोटव्याची खीर ॥

आले लींबें मेतकुट तेणें तोंड पोळें सुरसुर ॥
माहुरेचे दुदें तेणेंसि घेतलें उरिं उठलासे फोडु ॥ ४ ॥

असें त्रिष घेतां तोंडजें नासलें तयासि थंबन काय ॥
दुध धीरडीं आंबट भात पारठे ह्मसीचे दहीं ॥
साखरेसिं तिनि सप्रकें घेतलें ॥
मासामध्यें हाड नाहिंगे बाई ॥ ५ ॥

कुंपीचि कारलिं तुपें वाधारिलिं दोडके बहु कोंवळें ॥
सेंगा पडवळिं वांगियाच्या फोडी तेणें अधीक भीतरि जळें ॥
नाम म्हणे असें विख जरी मिळे ॥
तरी सहजची झांकती डोळेगे बाई ॥ ६ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ भीकाजि हरिदास कृत ॥)

## ॥ सासुर वास ॥

## ॥ सासु सुनाचे भांडण ॥

लोण्याची मज सासु नको कष्ट होताती भारिं ॥
पोटेंवीणे दगबदले मीं माये बाप माझे वैरि ॥ छ ॥

अज्ञानगे बाळपणिं माझी उजवण केली ॥
त्यामध्यें मज कळेलें नाहिं भटानें गोर गाइलि ॥ १ ॥

आवघें गांव माझें वैरी सगळ्या रांधिल्या तुरी गुळ
तेल त्या भीतरी ॥
चौं पांईल्याच्या भाकरी ॥
सासु माझी फळार करी ॥
आपुल्याल्या परिवारि ॥ २ ॥

आपण जेवी दुद मांडा मजला घाली घरभरि कोंडा ॥
नणंदा जावा दोघी जणि ॥
त्यातरि जगाच्या भांडा ॥ ३ ॥

सासूचे गे डोळे आले ॥
खंडेराया बरवें केलें ॥
रूचिकाचें वोखद केले ॥
दोहीं डोळांजे घातें ॥
बिबलें तेल काढुनियां नेणें कपाळ मर्दिलें ॥
घरांत पेवरी तें होतें ॥
त्यांत ढकलुनि जें दीधलें ॥ ४ ॥

घराचा उपाध्या घरासी आला ॥
वार्ता पुसों जो लागला ॥
तुमची सासु कैसी आहे त्यावरी उरपोट घेतले ॥
हळुच घरांत बोलाविलें ॥
तोहीं ढकलुनि जो दीधला ॥ ५ ॥

जे घरिं करकर तेथें पाली नव्हे स्थीर ॥
लटिकाचि मोहो जाळ नाशिवंत भीकाजि
हरीदास विठल सेवा निरंतर ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीः ॥

## (॥ मामा परमानंद — मामा प्रभु कृत ॥)

## ॥ हमामा ॥

॥ पद ॥

घालि पोरा हाममारे ॥
घाली पोरा हममारे ॥
घाली पोरा हममा काख वाजे खममा ॥
गाली गुणग्रामा ॥
पाहे मुळीच्याऊ ॥ छ ॥

रती संग सोडी ॥
वासनेसी जोडी ॥
कर्म जाल तोडी ॥
सेवि ब्रम्ह गोडी ॥ १ ॥

देवकीच्या कान्हा ॥
जरी होसी शाणा ॥
चाल वरल्या राणा ॥
घेई प्रेम पान्हा ॥ २ ॥

कल्पु नको काहीं ॥
होणार तेची पाही ॥
सहज स्थीती राही ॥
मामा प्रभु पाई ॥ ३ ॥ ॥ छ ॥ छ ॥

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

# ग्रंथांतलि कांहीं गोष्टींचा सोपें परिचय

| पृष्ठ | ओळी | ग्रंथांतील गोष्टी | प्रचलित गोष्टी |
|---|---|---|---|
| 1 | 4 | यां | यां |
| ,, | 11 | करूण | करूणा |
| 2 | 3 | तमासा | तमाशा |
| 3 | 17 | सोसते | सोसवे |
| 4 | 9 | वेल | वेळ |
| 4 | 9 | कटीन | कठीन |
| 5 | 9 | वल्हाले | वेल्हाळें |
| 5 | 18 | मादनाने | मदनानें |
| 6 | 3 | हरितालका | हरिताळिका |
| 7 | 2 | थेटवा | भेटवा |
| 8 | 17 | लागती | लागली |
| 9 | 9 | वीडे | विडे |
| 14 | 3 | प्रबलली | प्रबळली |
| 14 | 5 | अमाद् | आमोद् |
| 18 | 1 | घरूणी | धरूनी |
| 18 | 4 | वर्सेला | वर्षेला |
| 18 | 9 | मेद्नीरे | मेदिनीरे |
| 18 | 10 | वीवेक | विवेक |
| 19 | 26 | वीरक्त | विरक्त |
| 20 | 7 | अहंत्यचा | अहंत्येचा |
| 20 | 11 | तननु | तनुन |
| 21 | 10 | मुळ | मूळ |
| 21 | 19 | उद्यो | उद्दो |
| 22 | 18 | असुर कुळलि | असुर कुळी |
| 24 | 4 | कळुंकि | कलंकी |
| 24 | 12 | मूतिपना | मूर्तीपणा |
| 24 | 16 | ब्रम्हाडा | ब्रम्हांडा |
| 24 | 21 | दहिं | दहीं |
| 25 | 3 | वोडली | वोढली |

| पृष्ठ | ओळी | ग्रंथांतील गोष्टी | प्रचलित गोष्टी |
|---|---|---|---|
| 25 | 9 | उजळळि | उजळली |
| 25 | 12 | कोटे | कोठे |
| 25 | 17 | जुंनेस निधान | जुने संनिधान |
| 26 | 3 | आरंबे | आरंभे |
| 26 | 7 | ऊर्ध | ऊर्ध्व |
| 26 | 11 | " | " |
| 26 | 11 | वोलली | वोढली |
| 26 | 12 | भरयली | भरियली |
| 27 | 1 | वोडितां | वोढितां |
| 27 | 4 | वीवेक | विवेक |
| 27 | 12 | तरगं | तरंग |
| 27 | 17 | स्तान | स्थान |
| 27 | 26 | इर्द्र | इंद्र |
| 28 | 1 | दर्शण | दर्शन |
| 28 | 22 | अपपर | आपपर |
| 29 | 1 | अवस्ते | अवस्थे |
| 29 | 17 | गवलणी | गवळणी |
| 29 | 17 | आरंबुनि | आरंभुनि |
| 30 | 8 | ऊर्ध | ऊर्ध्व |
| 30 | 13 | प्रदत्तनिदत्त | प्रवृत्तनिवृत्त |
| 34 | 6 | सुखं | सुख |
| 34 | 19 | टोलारे | ठेलारे |
| 34 | 21 | कोटील | कोठील |
| 37 | 11 | सिखरी | शिखरी |
| 37 | 17 | स्तापिले | स्थापिले |
| 38 | 6 | आदारा | आधारा |
| 38 | 7 | सहश्रदेल | सहस्रदळ |
| 38 | 10 | काडीवो | काढीवो |
| 38 | 13 | समस्कारी | संसारी |

| पृष्ठ | ओळी | ग्रथांतील गोष्टी | प्रचलित गोष्टी |
|---|---|---|---|
| 38 | 15 | चिद्गन | चिद्धन |
| 38 | 15 | सांगतेंनीं | सांगातेनी |
| 39 | 17 | कांटी | कांठी |
| 40 | 1 | माझा | माझी |
| 41 | 19 | वेगला | वेगळा |
| 43 | 4 | सोहला | सोहळा |
| 43 | 6 | नवे | नव्हे |
| 45 | 4 | अभीळासे | उभिलाषे |
| 45 | 4 | तीन | तिनें |
| 45 | 4 | पाटीसी | पाठीसी |
| 47 | 15 | भाली | भाळी |
| 48 | 21 | जगजेटी | जगजेठी |
| 49 | 16 | किर्ति | कीर्ती |
| 50 | 17 | गाहला | गाइला |
| 51 | 3 | दीसी | दिसी |
| 51 | 10 | न्हेती | नेती |
| 51 | 13 | मद्ळहरी | मद्लहरी |
| 51 | 20 | उठ | उठा |
| 51 | 21 | पीसाटपण | पिसाटपण |
| 53 | 2 | ग्रांसुनि | ग्रासुनि |
| 53 | 16 | पिंगला | पिंगळा |
| 53 | 18 | „ | „ |
| 53 | 18 | निराला | निराळा |
| 53 | 19 | सोहला | सोहळा |
| 54 | 3 | पंरी | परी |
| 54 | 6 | आडलली | आढळली |
| 54 | 8 | साटी | साठी |
| 54 | 9 | स्वर्गाद्वनिवरी | स्वर्गादवनीवरी |
| 54 | 10 | पाताला | पाताळा |

| पृष्ठ | ओळी | ग्रंथांतील गोष्टी | प्रचलित गोष्टी |
|---|---|---|---|
| 54 | 23 | नामासाटीं | नामासाठीं |
| 55 | 10 | निर्दालुनि | निर्दाळुनी |
| 55 | 22 | जगजेटी | जगजेठी |
| 55 | 23 | देवदास | देवदास |
| 56 | 11 | तिनी | तीनी |
| 59 | 7 | म्हदया | ह्रदया |
| 61 | 13 | उधवासी | उद्धवासी |
| 61 | 14 | उधधी | उघडी |
| 64 | 3 | भोजेनाची | भोजनाची |
| 66 | 4 | पाउं | पाहुं |
| 67 | 14 | मीटी | मिठी |
| 68 | 10 | गिलुनी | गिळुनी |
| 68 | 12 | गिलुनी | गिळुनी |
| 68 | 12 | राये | राहे |
| 69 | 4 | चोरूणी | चोरूनी |
| 69 | 14 | का | काळु |
| 71 | 1 | उटल्या | उठल्या |
| 71 | 14 | जाळी | जाली |
| 71 | 17 | करूणी | करूनी |
| 71 | 19 | द्रिस्टी | दृष्टी |
| 72 | 1 | ईठी | ईटी |
| 72 | 2 | भुळीहुनी | मुळीहुनी |
| 72 | 8 | मुर्खाला | मूर्खाला |
| 72 | 11 | मुर्खाचे | मूर्खाचे |
| 72 | 16 | ग्राहीक | ग्राहीक |
| 73 | 8 | वंचणें | वचनें |
| 74 | 1 | ज्ञाला | झाला |
| 75 | 1 | हुनाचें भांडुन | सुनाचें भांडण |
| 75 | 4 | तीणें | तिनें |

| पृष्ट | ओळी | ग्रंथांतील गोष्टी | प्रचलित गोष्टी |
|---|---|---|---|
| 75 | 11 | मलिते | मळिते |
| 78 | 9 | नाम | नामा |

**सूचना**—या ग्रंथांतील पदें वगैरे जसें गाइलें गेलें तसेंच मूळग्रंथांत लिहिलें आहें आणि गावयांची धाटी व चालींचे पद्धति आतांच्या काळीं समजण्यासारिखें नहींत. म्हणून याग्रंथांत आढळणारे दीर्घह्रस्व इत्यादि चुकीं, चाली बिघडेल म्हणायाचें शंकेनें शुद्धीकरण केलें नाहीं.